।। श्री स्वामी समर्थाय नमः ।।

# ।। श्री गुरुचरित्र नवशती ।।


वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे

(B.A.M.S.)



मनकर्णिका पब्लिकेशन

मनकर्णिका प्रकाशन पुष्प -

★ ।।श्री गुरुचरित्र नवशती।।

★ © **वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे**
(B.A.M.S.)

★ **प्रथम आवृत्ती -**
**६ डिसेंबर २०१४ (श्री दत्त जयंती )**

★ लेखन सहाय्य
**सौ. प्रियंवदा अरविंद जोशी**

★ अक्षरजुळणी
**सौ. अर्चना गजानन एकतारे**
**श्री. गजानन अमृत एकतारे**

★ मुखपृष्ठ
**नयना मते**

★ प्रकाशक
**गिरीश दगडूलाल गांधी**
**मनकर्णिका पब्लिकेशन**
विशाल अपार्ट., पडवळ आळी,
चिंचवडगांव, पुणे - ४११ ०३३.
मो.- ९९२१६२५३८४
E-mail: manakarnikapc@gmail.com

★ मुद्रक
**'भाग्यश्री ऑफसेट प्रिंटर्स',**
संगमवाडी, पुणे - ४११००३.

★ मुल्य ₹ ५०/- (पन्नास रूपये मात्र)

।। श्री ।।

# ।।मनोगत।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जीवनात मनाप्रमाणे सारे काही मिळाले. सर्व सुख लाभले. प्रापंचिक सुखाची रेलचेल झाली ठीक आहे. पण पुढे काय? आपले मनच जर गुरुचरणी लीन झाले नाही तर हे सारे काही निरर्थकच नाही का?

ज्ञानमूलं गुरोर्मूर्ति पूजामूलं गुरोर्पादम्।
मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोर्कृपा।।

परमात्मा तर जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सर्व सृष्टीला व्यापुन आहे आणि या साऱ्याला व्यापुनही परमात्म्याचे जे दशांगुळ रुप उरते तेच गुरुतत्त्व स्वरुपात प्रकट होत असते.

अज्ञान तिमिरान्धस्य ज्ञानाञ्जन शलाकया। चक्षुरुन्मिलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः।।

अज्ञानरुपी अंधकाराने माझे डोळे बंद झाले होते ते ज्ञानरुपी अंजन घालून ज्यांनी उघडले त्या माझ्या परमगुरु श्री स्वामी समर्थांच्या चरणी माझे त्रिवार वंदन! सद्‌गुरु श्री स्वामी समर्थांच्या चरणी काया वाचा मने करुन प्रणाम करता क्षणी त्यांच्या कृपेच्या सहस्रधारांचा अभिषेक त्यांच्या कडून होत राहतो अन्‌ हे जीव कुसुम परमार्थाच्या सुगंधाने सुगंधित होऊन गुरुकृपेचा सुगंध माझ्या बरोबरच माझ्या बरोबर सर्वत्र वसणाऱ्या सर्व स्वामी भक्तांना त्याचा लाभ घडत राहतो. मी एक संवाहक! पण तरीही माझ्या सद्‌गुरुंच्या चरणी विसावलेला. मग सद्‌गुरु माझ्याकडून जे करवून घेतात ते साक्षीभावाने अनुभवत सारे श्रेय गुरुचरणी समर्पित करुन अजाण लेकरासारखा त्यांच्याच वात्सल्यात रमून जातो. अशावेळी माझ्या मनात येत राहते -

करता नहीं मै कुछ भी मेरा काम हो रहा है।
करते हो तुमही स्वामी मेरा नाम हो रहा है।।

आजपर्यंत गुरु माऊलींनी या सामान्य भक्त वैद्य श्री गणेश शिंदेच्या हातून अनेक कार्ये करवून घेतली आहेत. भव्य शक्तिपीठाची स्थापना घडवून आणली.असंख्य स्तोत्र, मंत्र माझ्याकडून तयार करवून घेतले. अनेक भक्तांना मार्गदर्शन करुन सावरले त्यांना प्रपंच सागरातून तारुन नेत परमार्थाची

वाटचाल करण्यासाठी पुढे नेत राहीले. आपल्या भक्तांवरील अपार प्रेमापोटी माझ्या कडून ‘‘ श्री स्वामी अमृतसार नवशती, श्री नवनाथ नवशती’ ’ या सारखी ग्रंथरचना करवून घेतली. आता गुरुचरित्र ग्रंथावरुन स्वामींच्याच प्रेरणेतून ‘श्री गुरुचरित्र नवशती’ साकार होत आहे. गुरुचरित्रासारख्या श्रेष्ठ परमपवित्र ग्रंथाचे नवशतीत रुपांतर होणे ही खरोखरच असामान्य प्रक्रीया पण प्रचंड स्वामी बळ पाठीशी आहे - अतर्क्य अवधूत स्मर्तृगामी - अशक्य ते शक्य करतील स्वामी याचीच जणु ही प्रत्यक्ष अनुभूती आहे असे म्हणण्यात कोणतीच अतिशयोक्ती नाही.

मला स्वामींचे कृपा छत्र अखंड लाभत आहे याचे महत्त्वाचे कारण म्हणजे माझ्या मस्तकी माझ्या परमपवित्र मातापित्यांचा अखंड आशीर्वाद आहे. माझे वडिल श्री लक्ष्मण शिंदे परम स्वामी भक्त होते. त्यांच्यावर स्वामींची अखंड कृपा होती. मी लहान असताना एकाएकी काही कारणाने माझी दृष्टि गेली, डोळयापुढे अंधार! त्यावेळी माझे वडिल श्री लक्ष्मण शिंदे यांच्यावर स्वामींनी कृपा केली अन् मला एक फुटापर्यंत दिसण्याएवढी दृष्टी लाभली. आजपर्यंतचे माझे संपूर्ण जीवनच स्वामींच्या कृपेने घडत गेले आज मी या घटनेचा जेव्हा जेव्हा विचार करतो तेव्हा माझ्या मनात असे येते की, जणु काही माझी दृष्टी घालवून स्वामींनी मला अंधार अन् प्रकाश यातील अंतर दाखवून

अध्यात्मातील अज्ञानंधकाराची जाणीव दिली. त्यामुळेच ज्ञानाच्या प्रकाशाची आस या जीवाला लागली. स्वामीभक्तीचा वारसा होताच! ती भक्ती दृढ होत गेली. प्रापंचिक माया मोहांची क्षणभंगुरता कळत गेली अन् शाश्वताची अनामिक ओढ लागली. आज मी शाश्वताच्या प्राप्तीसाठी स्वामींच्या चरणी विनंती करीत आहे. स्वामी हेच माझे सर्वस्व आहेत! अस म्हणतात -

आईच फक्त लेकराचे अंत:करण वाचू शकते ।
आईच फक्त लेकराचे दु:ख अनुभवत असते ।
तीच फक्त लेकराचे कल्याण निस्वार्थतेने चिंतीते ।
आईच फक्त लेकराचे जीवन घडवत राहते ।
तिला स्वार्थ नसतो स्वार्थ फक्त तिचे लेकरुच असते ।
तिचा परमार्थही केवळ लेकराचे कल्याणच असते ।

आता पुढे जाऊन मी म्हणतो -

आईची साथ फक्त एका जन्माची असते ।
गुरुमाऊलीची साथ जन्म जन्मांतरीची असते ।।

गुरुमाऊली लेकराचे शाश्वत कल्याण चिंतीते ।
लेकराच्या प्रपंचाचे ओझेही तीच वाहते ।।
प्रपंचातून परमार्थाकडे सहजतेने घेऊन जाते ।
अपार करुणेने वात्सल्याने कृपा पाखर घालते ।।
प्रेमाने बोट धरुन परमेश्वराकडे घेऊन जाते ।
जीवनात अन् नंतरही मोक्षाचा अखंड लाभ देते ।।

मी स्वामी समर्थांच्या चरणी सर्व समर्पण भावनेतून आलो आहे. तेच माझे मोक्षदाता गुरुमाऊली आहेत. त्यांच्याच कृपेने ही गुरुचरित्र नवशती साकार झाली आहे. यातील अक्षर हे अ - क्षर आहे. शब्दांना मोक्षाचा अर्थ आहे. परमार्थाचा सुगंध आहे अन् समर्पणाचा भाव आहे. हे सारे स्वामींचेच! मी ही त्यांचाच! आपण सर्वच जण त्यांचेच आहोत! त्यांच्याच चरणी हे ग्रंथपुष्प समर्पित करताना मन कृतज्ञतेने भरुन येते. धन्य कृतार्थ झाल्याची साक्षात अनुभूती येते. या कृतार्थ भावनेने हे स्वामी समर्थांच्या चरणी समर्पित करतो, आणि स्वामीसमार्थांचे हट्टी लेकरु म्हणून थोडेसे मागणेही मागतो.

मी श्री स्वामी समर्थ चरणी नम्र विनंती करतो की ह्या ग्रंथ लेखनाच्या कामात सहाय्य करणाऱ्या

स्वामीभक्त सौ.प्रियंवदा अरविंद जोशी यांच्यावर व त्यांच्या कुटुंबावर स्वामीकृपेचे छत्र असेच राहून त्यांना स्वामी आशीर्वादाचा अमृत लाभ अखंडपणे होत राहू दे. त्याचप्रमाणे या ग्रंथाचे निर्दोष संगणकीकरण करण्यासाठी अपार कष्ट घेणारी माझी भगिनी स्वरुप स्वामी भक्त सौ.अर्चना गजानन एकतारे आणि तिचे पती श्री गजानन अमृत एकतारे यांच्यावर व त्यांच्या कुटुंबावर स्वामीकृपेचे छत्र अखंड राहू दे व त्यांना स्वामी आशीर्वादाचा अमृत लाभ अखंड मिळत राहू दे. हा ग्रंथ प्रकाशित करणारे मनकर्णिका पब्लिकेशनचे श्री गिरीश दगडूलाल गांधी यांनाही स्वामीकृपा आशीर्वादाचा अमृत लाभ अखंडपणे होत राहू दे. मुखपुष्ठकार नयना मते यांनाही स्वामीकृपा आशीर्वाद लाभो.

स्वामी भक्तांसाठी अशी ही ज्ञानामृताची पाणपोई स्वामींनी निर्माण केली आहे. त्यातून सर्व भक्तगणांना स्वामी कृपेचा ज्ञानामृताचा लाभ अखंडपणे होत राहू दे अशी श्री स्वामी समर्थ सद्‌गुरुंच्या चरणी नम्र विनंती करुन हा ग्रंथ त्यांनाच समर्पित करतो.

।। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।।

स्वामीभक्त वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे

## अनुक्रमणिका


| अध्याय | अध्यायाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| पहिला | स्वानंदाध्याय | १० |
| दुसरा | परमानंदाध्याय | २१ |
| तिसरा | आशीर्वादाध्याय | ३२ |
| चवथा | परमआशीर्वादाध्याय | ४३ |
| पाचवा | वरदाअभय हस्तकाध्याय | ५४ |
| सहावा | सच्चितानंदाध्याय | ६५ |
| सातवा | परमोच्चआनंदाध्याय | ७६ |
| आठवा | सद्‌गुरुसुखदाध्याय | ८७ |
| नववा | परमसंदेशाध्याय | ९८ |

## पहिला अध्याय

## ।। **स्वानंदाध्याय** ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

प्रथम नमितो गिरिजाकुमरा। जय जय गजवक्त्रा दयाळा। विनम्र तव चरणी लंबोदरा। देई वरदान भक्तवत्सला।।१।। तू प्रसन्न असता कृपासागरा। उणे काय असे तुझ्या भक्ता। श्री गुरुचरित्र वर्णिण्या आता। देई मति या लक्ष्मण सिंधुसुता।।२।। आता वंदितो वीणापाणि सरस्वती। विद्या तिच्या कृपे सर्व लाभती। विद्यास्वामिनी तू या विश्वाची। वर्णिण्या गुरुचरित्र देई स्फूर्ती।।३।। आता वंदू मी त्रिमूर्तिसी। ब्रह्मा विष्णु अन् शिवासी। नम्र विनंती तयांच्या चरणासी। द्यावे विद्या ज्ञान मजसी।।४।। नमितो आता कुलस्वामिनी। असे तीच जगज्जननी। लाभे तिच्या कृपे कृतार्थता जन्मी। माता माझी ती वरदायिनी।।५।। जननी जनका तुमचे हे लेकरु। गुरुचरित्राचे वर्णन इच्छितो करु। करावे लिहीते देऊनी आशीर्वचु। विनवणी हीच तुमच्या चरणी।।६।। श्री गुरुचरित्र असे महोदधी। वर्णिण्या द्यावी

मज बुध्दि ।श्री गुरुनाम नृसिंह सरस्वती। समस्त जन तया आराधिती।।७।। भक्त एक नामधारक म्हणूनी। सदा चित्त त्याचे गुरुचरणी। कष्टतसे अतीव व्याकुळ मनी। दृढनिश्चयी निघे तो गुरुदर्शना।।८।। अति व्याकुळ तो असे चित्ती। विविधरीती करी गुरु स्तुती। द्यावे दर्शन म्हणून करी विनंती। कृपासागर पाव मजसी।।९।। गुरु हेची त्रिमूर्ती म्हणती वेदश्रुती। कलियुगात तारक नरसिंह सरस्वती। भक्तपालक भक्तरक्षक असती। द्यावे दर्शन मजसी वेगी।।१०।। माझे पूर्वजे सेविले तुम्हासी। तुम्हीच आम्हा कुलदैवत असा की। नामधारक हा विनवी तुम्हासी। कृपा करावी मजवरती।।११।। गुरुमहिमा असे थोर अपार। कवणे शब्दी लाभे त्याचा पार। परी वदतो मूढ मी काही अक्षर। व्हावी पवित्र माझी वाणी।।१२।। करुणाकर करुणाघन तुम्ही चित्ती। पुकारिता करुणे प्रकटे वात्सल्यमूर्ति। गुरुनाथच प्रत्यक्ष स्वप्नी अवतरती। नामधारक ठेवे माथा चरणी।।१३।। नामधारक झाला आनंदित । पाहुनी गुरु होती संतोषित। भक्तहृदयीच वसती गुरुनाथ।जाहला संतोष सरस्वतीसी।।१४।। प्रसन्न तयासी जाहला सिद्धमुनी। हिंडतो आम्ही तीर्थे भुवनी। आमचा गुरु नरसिंह सरस्वती। अमरजा संगमी तो राहतसे।।१५।। ऐकोनी सिद्धमुनिंचे वचन। विनवितसे तया नामकरण। वंशोवंशी आम्ही तयांचेच भक्त। कष्ट आम्हा केवी पडे।।१६।। मुनी म्हणे ऐसे गुरु तुज असती। तरी सांगसी तव

दैन्य वृत्ति। नसेल तुज मनी दृढ भक्ती। म्हणूनी कष्ट भोगितोसी।।१७।। त्रयमूर्तिच प्रत्यक्ष जाहले श्रीगुरु। ते असती कृपासागर निर्धारु। राखिती भक्तांसी नरसिंह गुरु। कळिकाळा पासूनही।।१८।। ऐकोनी ऐसे नामधारक। म्हणे चित्ती माझ्या संदेह। प्रत्यक्ष ब्रह्मा - विष्णु - महेश्वर। श्रीगुरुमूर्ती केवी जाहले।।१९।। आणिक तुम्ही सांगितले की। विष्णु रुद्र हे जरी कोपती। रक्षितसे श्रीगुरु निश्चिती। गुरु कोपलिया कोणी न राखे ।।२०।। हा बोल असे कवण शास्त्रपुराणी। पूसतसे मुनींस नामकरणी। सिध्द सांगतसे बहु संतोषुनी। वेदवाक्य असे यास साक्षी।।२१।। वटपत्र शयनी असता नारायणा। बुध्दि उपजे करावी सृष्टिरचना। जागृत तो होई याकारणा। आदिपुरुष नारायण ।।२२।। ब्रह्मा प्रकटे तयाचे नाभीकमळी। 'मी महाविष्णु' नारायण म्हणे त्यावेळी। 'सृष्टिरचना करी' ऐसे म्हणूनी। ब्रह्मयास आज्ञा देती।।२३।। ब्रह्मा विनवी महाविष्णुसी। नेणे सृष्टिरचना कैसी। म्हणूनी विष्णु देती वेद त्यासी। म्हणती सृष्टिविस्तार असे यात।।२४।। वेदानुसरे ब्रह्मा करी सृष्टिरचना। कृत सत्यादि युगे होती नाना। द्वापारयुगाचा अंत होता ब्रह्मा। कलीयुगाते आज्ञा देतसे।।२५।। कलीयुग म्हणे मग ब्रह्मयासी। जिंकीन मी समस्त लोकांसी। परी लिंग - जिव्हा रक्षणारांसी। हारी असे आपणाते।।२६।। ब्रह्मा मग म्हणे कलीसी। न पीडावे तू धर्मवर्तियासी। जे मनोमनी पूजिती श्रीगुरुसी। पीडा त्यांसी तू करु

नये।।२७।। श्री गुरुच म्हणजे प्रत्यक्ष माता -पिता। ब्रह्मा विष्णु रुद्रच निश्चिता। ते कोपले तरी गुरु राखी निश्चिता। परी गुरु कोपता न अन्यत्राता।।२८।। ऐक गुरु होता पैलपुत्र वेदधर्म नामी। तयाचे शिष्य सेविती रात्रंदिनी। तयाचाच शिष्य संदीपक नामी। परीक्षा तयाची गुरु पाहती।।२९।। कुष्ठी गुरुंस आणुनी वाराणसीसी। संदीपक सेवा करीतसे त्यांसी। हरहरी प्रसन्न जाहले शिष्यासी। म्हणती त्यासी माग वरदान।।३०।। तो म्हणे तुम्ही मज काय देणार। मम गुरुच पुरविती सर्व चोज। विष्णु म्हणे संतोषुनी वर माग। प्रसन्न आम्ही अती जाहलो।।३१।। मग दिपक म्हणे श्री विष्णुसी। जरी वर देऊ पाहता मजसी। गुरुभक्ती हो स्थिर मानसी। ऐसे ज्ञान मजला द्यावे।।३२।। पाहुनी गुरुभक्ती शिष्याची। होती गुरु प्रसन्न मानसी। जाहले ते दिव्यदेह तत्क्षणेसी। झाले होते गुरु कुष्ठी शिष्य परीक्षिण्या।।३३।। ऐसे दिपक आख्यान सांगोनी। सिद्ध म्हणे बा नामकरणी। असावी गुरुभक्ती अंतःकरणी। भवसागर सहज तरुन जासी।।३४।। नामधारक म्हणे सिध्दमुनी तुम्ही। संदेह मम मनीचा निवारोनी। श्री गुरुमहिमा, ज्ञान निरोपोनी। धन्य केले मजसी आज।।३५।। वदावे कवणे ठायी आपला निवासु। नित्य तुम्हासी कोठे ग्रासु। मी आपुला झालो चरणदासु। म्हणोनी चरणी लागतसे।।३६।। सिध्दमुनी म्हणती तयासी। आम्ही सदैव गुरुस्थान वासी। श्रीगुरुचरित्रामृत प्रिय

आम्हासी। तयानेच होतो तृप्त आम्ही।।३७।। मग नामधारकास धरुनी करी। येती मुनी अमरजा संगमी। बैसोनी कल्पवृक्ष अश्वत्थ वृक्षतळी। सांगती गुरुमहिमा तयासी।।३८।। अविद्याकारणे असे संशय मानसी। गुरुचरित्र महिमा न जाणसी । त्यागुणे विविध भोग भोगिसी। चित्त तुझे असे व्याकुळीत।।३९।। गुरुमुर्ति असती कृपासागर। सकल सौख्याचा तोची दातार। गुरु असे कल्पवृक्षाहुनी थोर। न कल्पिताही पुरवी कामना।।४०।। ऐकुनी ते म्हणे नामधारक। जाहले माझे मन निर्मळ। आता मनासी वेध असे केवळ। ऐकीन चरित्र श्रीगुरुंचे।।४१।। तया मनीची कामना पाहुनी। प्रसन्न जाहले सिद्धमुनी। गुरुचरित्रामृत असे सौख्यखाणी। सांगतो ऐक प्रसन्नचित्ति।।४२।। कार्याकारण घेऊनी अवतार। हरिहर येती उतरावया भूभार। ब्रह्मासह आले हरिरुद्र आपण। अवतरले नरवेषी कलियुगी।।४३।। ब्रह्मा विष्णु महेश त्रिमुर्ती। एकावेगळे एक नसती। अंबरीष ऋषि करी व्रत द्वादशी। तयासाठी श्री विष्णु अवतार घेती।।४४।। सिद्धमुनी वर्णिती अंबरीष कथा। येती दुर्वास भंग करण्या व्रता। अंबरीष स्वागत करी अभ्यागता। दुर्वास गेले आरोगणासी।।४५।। दुर्वास येण्या जाहला विलंब। अंबरीष करी पारणे तीर्थ घेऊन। दुर्वास शापितसे तया कोपून। घेई विष्णु शाप आपणावरी।।४६।। असती दुर्वास मुनी ज्ञानी थोर। जाणती विष्णु घेतील अवतार। सलक्ष्मी येऊन रक्षतील भक्त परिवार।

म्हणुनी शापिती ते विष्णुसी।।४७।। विष्णुचे भूवरी दशावतार झाले। असती महाभागवती वर्णिले। विष्णुनेच स्थूल सूक्ष्म व्यापिले। असे तो प्रत्यक्ष विश्वात्मा।।४८।। आणिक एक कथा सांगतो तुज। अत्रि आश्रमी आले त्रयमूर्ति आपण। अवतरले मनी धरुनी कपट। पुत्र जाहले ते अनुसूयेचे।।४९।। सप्त ब्रह्म पुत्रांतील एक अत्री। भार्या तयांची एक अनुसूया सती। पतिव्रता शिरोमणी विनित चित्ती। साक्षात जगदंबा तीची जाण।।५०।। सत्त्व पारखण्या त्या सतीचे। त्रयमूर्ति वेष धरिती भिक्षुकाचे। अभ्यागत होऊनी आश्रमा आले। अतिथी आलो तिज म्हणती।।५१।। क्षुधापीडीत आम्ही ब्राह्मण। सवेची द्यावे आम्हासी अन्न। देता तुम्ही इच्छाभोजन दान। म्हणूनी आलो तुमच्या गृही।।५२।। अर्घ्य पाद्य देऊनी तयांसी। सवेची म्हणे ती होऊन हर्षी। आरोगण सारुन यावे त्वरीती। देईन इच्छाभोजन तुम्हासी।।५३।। आम्ही करुनी आलो आंघोळी। क्षुधेने व्याकुळ झालो आम्ही। द्यावे त्वरीत भोजन आम्हासी। अनुसूया तया बैसवी पाटावरी।।५४।। वदती कपटे ते अनुसूयेसी। नग्न होऊनी वाढ आम्हासी। नातरी घेऊ न आम्ही अन्नासी। जाऊ ऐसेची विन्मुख।।५५।। म्हणे मनी मन माझे अतिनिर्मळ। तेथे काय करील मन्मथ खळ। पतीचे असेल जरी तपफळ। तारील मज मन्मथा पासून।।५६।। चिंतन करुनी मग पतीचरण। वस्त्रे फेडूनी झाली ती नग्न। वाढण्या घेऊन आली अन्न। तिन्ही देव

झाले बालक।।५७।। बालके देखुनी मात अनुसूया। पुनरपि आली वस्त्रे नेसुनिया। स्तनपान देऊनी त्या बालकांना। निवारण करी ती क्षुधेचे।।५८।। माध्याह्नी अत्रिऋषी घरी येती। पाळणा अनुसूया गात होती। कैसी ही बाळे ऐसे म्हणती। अनुसूया सांगे वृत्तांत।।५९।। अत्रिऋषी ज्ञाने पाहती। पाळण्यात असती त्रिमूर्ती। नमस्कारिती तयांसी अत्रिऋषी। प्रसन्न त्रिमूर्ती जाहले।।६०।। वरदान मागा म्हणता मागती। बालके होऊन ऐसेच तिघांनी। रहावे आम्हा घरी पुत्र होऊनी। त्रिमूर्तिंनी असावे एकरुप।।६१।। ब्रह्मा मूर्ति चंद्र जाहला। विष्णुमुर्ति दत्त केवळा। ईश्वरास दुर्वास नाम ठेविले। तिघे पुत्र अनुसूयेचे ।।६२।। दुर्वास म्हणे आम्ही ऋषि। चंद्र म्हणे वास माझा चंद्र मंडळी। विष्णुमूर्ति असेल तुम्हा समेती। त्रिमूर्ती रुप तेच असे।।६३।। अनुसूयेच्या घरी देखा। त्रयमूर्ती राहिली मूर्ति एका। नाम तयाचे दत्तात्रेय ऐका। मूळपीठ हेच श्रीगुरुंचे।।६४।। द्वापार जाऊनी जाहला कली। अज्ञान आचारहीन झाले प्रबळी। भक्तरक्षणार्थ त्या समयी। अवतरती प्रत्यक्ष गुरुनाथ।।६५।। पीठापूरी आपळराज उत्तमवंशी। तयाची भार्या नाम सुमती। पतिव्रता साध्वी सती नारी। अतिथी पूजा करी भक्तिभावे।।६६।। ऐसे असता आला दत्त अतिथी वेषी। श्राध्द होते गृही अमावस्येसी। न जेविता ब्राह्मण ती भिक्षा घाली। दत्तात्रेय प्रसन्न जाहला।।६७।। त्रिमूर्तीरुप घेऊनी दत्त म्हणती। माग माते काय इच्छिसी।

मनिषा जी असेल तव मानसी। होईल त्वरीत पूर्ण ती।।६८।। म्हणे ती माते वर देसी। वासना जी असेल मानसी। न व्हावे अन्य आपुले बोलासी। कृपासिंधु स्वामी देवराया।।६९।। ऐकोनी तियेचे ऐसे करुणावचन। संतोषला त्रयमूर्ति आपण। देऊनी तिजसी आश्वासन। वर माग जननी म्हणतसे।।७०।। तव वदे ती पतिव्रता। म्हणे स्वामी जे निरोपिले आता। जननी नामे मज पुकारिता। करावे सत्य या वचनासी।।७१।। दत्त प्रसन्न होऊनी म्हणे तियेसी। पुत्र होईल तुज तापसी। उध्दरील तुझ्या वंश कुळासी। जगदोध्दारक होईल तो।।७२।। आनंदुन विस्मये येई ती घरात। जाहला वृत्तांत पतीसी निवेदीत। दोघेही जाहले अतीव हर्षभरीत। म्हणती होईल दत्तात्रेय।।७३।। राहली निश्चिंत ती हर्षित होऊनी। वर्तता दिन जाहली गर्भिणी। जाती आनंदे नवमास क्रमोनी। जाहली प्रसूत शुभदिनी।।७४।। विप्रे केले जातकर्म तये वेळी। मिळवोनी समस्त विप्रकुळी। जातक वर्तविती अती आनंदोनी। होईल दीक्षाकर्ता जगद्‌गुरु।।७५।। श्रीपाद तयाचे नामकरण करती। करती मुंजी बंध सात संवत्सरी। बांधिती मुंजी ब्रह्मचारी। बालक तीन वेद म्हणतसे।।७६।। आचार व्यवहार प्रायश्चित्त। समस्तांसी बालक बोलत। वेदांत भाष्य आणि वेदार्थ। सांगत असे द्विजवरांसी।।७७।। वर्तता ऐसे परियेसी। झाला संवत्सर षोडसी। विवाह करु म्हणती पुत्रासी। मातापिता अवधारा।।७८।। म्हणे आपण

तापसी ब्रह्मचारी। योगश्रिया वाचोनी अन्यनारी। न लगती हाच बोल निर्धारी। 'श्रियावल्लभ'नाम माझे।।७९।।पुत्र स्नेहे माता करी अश्रुपात। होऊनी पडली मूर्च्छागत। देखोनी मातेचे दु:ख परमपुरुष। अश्रु तियेचे पुसतसे।।८०।। ऐकोनी जननीचे वचन। अवलोकी अग्रजांस अमृत नयने। जाहले दोघेही सगुणपूर्ण। ज्ञानवंतही ते जाहले।।८१।। म्हणती मग ते स्वमातेसी। पाहोनी या दोघा पुत्रांसी। होतील पुत्रे हे शतायुषी। निरोप द्यावा मज आता।।८२।। ऐसे सांगुनी मातेसी। अदृश्य होऊनी पातला काशी। जावोनी मग बदरी काननासी। मनोवेगे आला गोकर्णासी।।८३।। नामधारक पूसे स्वतः त्रिमूर्ती असोन। तीर्थे नाना करती किंकारण। विशेष काय असे गोकर्णस्थान। म्हणोनी श्रीपादगुरु तेथे जाती।।८४।। मुनिवदे दत्त स्वतः त्रिमूर्ती असून। नाना तीर्थे हिंडती भक्ताकारण। असे गोकर्ण विशेष स्थान। म्हणूनी त्रिमूर्ती वसती तेथे।।८५।। गोकर्णी वसे प्रत्यक्ष शंकर। लिंग असे तेथे महाबळेश्वर। आख्यान तयाचे अती सुंदर। सांगतो ऐक शांत चित्ति।।८६।। रावणमाता कैकया करी लिंगपूजन। एके दिनी न मिळे लिंग म्हणून। पूजित होती भावे मृत्तिका लिंग। देखूनी रावण म्हणतसे।।८७।। आणून देईन कैलासच तुजसी। मृत्तिका लिंग तू काय पूजसी। म्हणूनी पावला त्वरीत शिवपुरासी। शिवभक्ती प्रेमे करीतसे ।।८८।। शंकर प्रसन्न झाला रावणासी। रावण म्हणे

नेईन मी कैलासासी। शिव म्हणे काय करिसी कैलासासी। म्हणून आत्मलिंग तया देतसे।।८९।। हे लिंग म्हणजे माझा प्राण। ठेवू नको तू ते भूमिवर। वर्षे तीन पूजा करी समग्र। तूची प्रत्यक्ष ईश्वर होशील।।९०।। इंद्रासह देव जाहले भयभीत। विनवीती मग ते श्रीविष्णुस। विष्णू पाठवी श्रीगणेशास। नारद अडवी मार्ग रावणाचा।।९१।। नारद म्हणे सूर्यास्त आता होईल। संध्याकाळी का क्रमिसी मार्ग। वाटेतच मग निशा होईल। संध्यालोप तुझा होईल।।९२।। रावण म्हणे शिवे सांगितले मज। लिंग न ठेवावे भूमिवर। कैसे करु मी संध्यावंदन। इतुक्यात बालक त्याने देखिला।।९३।। नानापरी समजावून तयासी। हस्ते तयाच्या देऊन लिंगासी। निघाला रावण सायं संध्येसी। बालक त्या म्हणतसे।।९४।। लिंग जड झालीया मजसी। तीन वेळा बोलवीन तुम्हासी। न याल परत जरी स्थानासी। ठेवीन लिंग भूमिवरी।।९५।। अर्घ्या समयी बोलवी रावणासी। म्हणे हे लिंग जड झाले मजसी। रावण हस्त दावून सांगे तयासी। येतो थांब म्हणूनी।।९६।। आणिक एक क्षण पाहुनी। बालक म्हणजे गणेश बोलावे त्यासी। दोन वेळा बोलावूनही रावण न ये परती। लिंग गणेशे ठेविले भूमिवरी।।९७।। अर्घ्य देऊन परतसे लंकापति। का बालका लिंग ठेविले भूवरी। म्हणूनी टोले हाणी गणेशासी। महाबळे लंकेश लिंग उचलू पाहे।।९८।। रावण उचलू गेला महाबळी। परी न मुरडोनी

काढता ये त्यासी। शिर बडवून घेई तो पश्चातापी। गोकर्ण महाबळेश्वर म्हणती त्या स्थाना।।९९।। महाबळेश्वर लिंग नव्हे प्रत्यक्ष शिव। तयाचा महिमा असे अनुपम। गोकर्णी येती समस्त देव। म्हणूनी त्रिमूर्ती येथे वास करती।।१००।।

।। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।।

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा। गुरु:साक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः।
सुखासन घालूनी भूमीस्थळी। श्रवण वा पठण करता हा अध्याय।
सुखावोनी माता पीता सगे सोयरे सहीत। आनंद होऊनी तयासी खुष होतील मनात।
अज्ञानासी बनवी ज्ञानी दरीद्र्यासी देती धन। वांझेसी देती पुत्र आल्हादीती करीता पठन।
स्वप्नामध्ये येऊनी कुबेर धनाढ्याचा देती वर। चौरासी नाथ घालती पांघरुण येथील दु:खावर।
देती अभय दत्तगुरु या पामरास। 'भिऊ नकोस मी पाठीशी आहे' म्हणती या जिवास।

दुसरा अध्याय

## ।। परमानंदाध्याय ।।

**श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।**
**श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।**

श्री गुरुमहिमा मी वर्णू किती। श्री गुरुचरित्रामृत साठवावे चित्ती। शब्दात कथार्थ उतरविण्या मती। बुद्धी द्यावी या भक्तास गुरुराया।।१।। नामधारक म्हणे सिध्दमुनींसी। गोकर्ण महिमा सांगा मजसी। सिध्द म्हणे सांगेन सविस्तर तुजसी। एकाग्र चित्ते ऐक तू।।२।। पूर्वी राजा मित्रसेन ईक्ष्वाकुवंशी। सर्वधर्मरत क्षत्रिय वंशी। विवेकी बलाढ्य शूर दयानिधी। सहज निघाला पारधीसी।।३।। राजे वधिला ज्वालाकार दैत्य। सूड घे तयाचा दैत्य बंधुसी सांगत। मायावी तो धारण करुनी नररुप। सेवक जाहला राजयाचा।। ४।। ऐसे होता एके दिवशी। पितृश्राध्द होते त्या दिवशी। राजा आमंत्रण देई ॠषिंसी। वसिष्ठादि मुनिवर आले।।५।। इकडे पाकस्थानी शिजवूनी नरमांस। कापट्यभावे तो दैत्य करवी पाक। ॠषिपानांत वाढिले नरमांस। बहु कोपले वसिष्ठ ॠषी।।६।। कोपे शापिती ते राजासी।

राजा म्हणे निरपराधी मज शापिसी। राजा उदक घेई तया शापिण्यासी। पत्नी मदयंती वारितसे।।७।। पतीसी म्हणे ती नारी। गुरुसी शापिता दोष भारी। वंदून तयांचे चरण धरी। तेणे तरशील भवसागर।।८।। राजा मानितसे सतीचे वचन। अंजुळीत परी उदक होते जाण। शापयुक्त जल पाडी तो चरणांवर। झाला तो ब्रह्मराक्षस।।९।। जाहले तयाचे कल्माषपाद नाम। भक्षितसे तो पशु मनुष्यादि करुन। ऐसे क्रमित असता एक दिन। विप्र दांपत्य तयाने पाहीले।।१०।। पत्नी विनवी परोपरी राक्षसासी। परी ब्रह्मराक्षसे भक्षिले विप्रासी। विप्रपत्नी शाप देई त्यासी। म्हणे फळेल द्वादशवर्षांतरी।।११।। विप्रपत्नी म्हणे रमता तू स्त्रीसवे। प्राण तुझा जाईल स्वभावे। माझ्या पतीस भक्षिले दुष्टभावे। दुरात्मा असशी राक्षसा।।१२।। ऐसी बारावर्षे निघून जात। झाला पुनरपि राजा तो ब्रह्मराक्षस। विप्रस्त्रीचे शापवचन सांगे स्त्रीस। अतीव दुःखी झाली ती।।१३।। पुरोहीतांसी राजा पूसे विमोचन। म्हणती आचारावी तीर्थे समग्र। स्त्रीसह राजा करी तीर्थाटन। ब्रह्महत्या पाप न सोडे त्यास।।१४।। अवचित तयासी भेटले ऋषि गौतम। पूसती कारण पाहून म्लानवदन। सांगती त्यासी करुणासागर गौतम। शंकर मृत्युंजय तारील तुज।।१५।। मग चांडाळी कथा सांगती गौतम। म्हणती ती महापापी असून। सकल शाप मुक्त ती होऊन। दिव्य देहे गेली शिवलोक।।१६।। पुण्ये आली ती गोकर्णासी। सहजी उपोषण

घडले तियेसी। बिल्वपत्रे घडली पूजा शिवाची। शिवदूत तिसी घेऊन जाती।।१७।। ऐकोनी गौतमाचे वचन। राजा मनामध्ये संतोषून। पावला त्वरीत तो गोकर्ण। पापा वेगळा जाहला जाणा।।१८।। ऐशा पवित्र पावन गोकर्णक्षेत्री। श्रीपाद राहीले तीन वर्ष गुप्तरीती। तेथूनी ते येती श्रीगिरी पर्वती। लोकानुग्रह करणेसाठी।।१९।। मास चार क्रमोनी तेथे। दर्शन देण्यास्तव भक्तलोकाते। पातले कुरवपुर निवृत्ती संगमाते। ख्याती जाहली भूवरी।।२०।। महिमा थोर त्यांचा अपरंपारी। भक्त सौख्य पावती अप्रयासी। जे जे चिंतीले ते सर्व भक्त पावती। महिमा तयांचा वर्णने अशक्य।।२१।। श्रीपाद कुरवपुरी असती। अवतार त्यांचा व्हावया गती। सांगेन सर्व ऐक एकचित्ती। कार्यकारण पुढे असे।।२२।। वेदशास्त्र संपन्न विप्र होता ग्रामी। पत्नी अंबिकेसह तीर्थव्रत आचरी। परी तीते पुत्र होऊनी मरती। तयांसी पुत्र जाहला मंदमती।।२३।। माता तयासी स्नेह करी प्रीती। विप्र असे असमाधानी चित्ती। म्हणे काय असे प्रारब्धगती। पंचत्व पावला तो विप्र।।२४।। जन पुत्रासी अनेकपरी निंदिती। घातले तू पितृव्य अधोगती। निरर्थक ऐसे जीणे जगती। गंगाप्रवेश का न करिसी ।।२५।। ऐकोनी अतिदुःखी होई सुत। माताही तयाची शोक करीत। दुःखी उभय गेली गंगा प्रवाहात। श्रीपाद यतिंसी त्यांनी पाहीले।।२६।। वंदुनी 'द्या निरोप' म्हणती त्यांसी। आत्महत्त्या करणे महादोषी। सद्गती द्यावी आपण आम्हासी।

आपण थोर कृपा सिंधु।।२७।। विप्रस्त्री स्वदु:ख सांगे यतीसी। अनेक व्रते केली पुत्रासाठी। परी पुत्र होऊन मरती। वाचला तो एक मतिमंद।।२८।। माता विनवी श्रीपाद यती। न व्हावा पुत्र मंदमती। ऐसा उपाय सांगा मजसी। करावी कृपा मजवरी।।२९।। श्रीपादयती मग सांगती तियेसी। ईश्वर पूजन करी तू प्रदोषी। विशेष करुन शनिप्रदोष दिवशी। पूजा करी तू भक्तीने।।३०।। श्रीगुरु सांगती विप्रस्त्रियेसी। उज्जनी नगरी चंद्रसेन नृपती। भक्तिभावे तो पूजितसे शिवासी। शिवाने त्यासी चिंतामणी दिधला होता।।३१।। नृप भावे पूजा करी शिवाची। ती पाहून मुले गवळणींची। खेळती लिंग करोनी अतिप्रीती। षोडशोपचारे पूजा करिती।।३२।। गोप स्त्रिया येऊनी नेती पुत्रांसी। एक पुत्र न जाई सोडोनी लिंगासी। मारी माता आपुल्या पुत्रासी। मोडी पूजा ती संतापुनी।।३३।। पूजा मोडिता तो बालक। प्रलाप करीतसे तो अनेक। पडला मूर्च्छा येऊन क्षणैक। शिव प्रसन्न झाला त्यासी।।३४।। तेथे जाहले शिवालय रत्नखचित। सूर्य तेजे जैसे शोभत। लिंग दिसे रत्नखचित। जागृत झाला बालक।।३५।। निजरुप धरुनी उमारमण। उठवी बालका करी धरुन। 'वर माग' म्हणे जाहलो मी प्रसन्न। जे वांधिसी ते देईन।।३६।। बालके विनविले श्री शंकरासी। कोप न करावा मातेसी। पूजा मोडिली तिने प्रदोषी। करावी क्षमा तिजसी।।३७।। शिव म्हणे जे जे तू मनी इच्छीसी। पावसील जे असेल मानसी। पुत्र

पौत्रासह पावसील सुखासी। ऐसे म्हणुनी शिव गुप्त जाहला।।३८।। श्रीपाद म्हणती त्या विप्रस्त्रीसी। सोडूनी सर्व संशयासी। पूजी शंभु तू शनि प्रदोषी। मजसरी पुत्र तुज होईल।।३९।। बोलावूनी तिच्या कुमारासी। ठेविती हस्त मस्तकावरती। ज्ञान तया जाहले तत्काळेसी। त्रिवेदी झाला शास्त्रज्ञ।।४०।। सिद्ध सांगे रजकाची कथा। सेवक तो झाला श्रीगुरुंचा। एके दिनी सेवा करित असता। पाहीला त्याने म्लेंच्छ राजा।।४१।। पाहुनी त्याच्या सौख्य वैभवा। वासना उपजली त्याचिया मना। श्रीगुरु ओळखती त्याची कामना। पूसती 'काय चिंतितोसी?'।।४२।। श्रीगुरु म्हणती मग त्यासी। तुवा जन्मावे म्लेंच्छ वंशी। आवडी बहु असे तव मानसी। राज्य भोगी जाय त्वरीत।।४३।। म्हणे तो अंतरतील हे चरण। आपण मज द्यावे पुनर्दर्शन। तुमचा अनुग्रह असे कारण। शुद्ध ज्ञान द्यावे मजसी।।४४।। श्रीगुरु मग म्हणती तयासी। वैदुरानगरी तू जन्म घेसी। भेटी देऊ तुज अंतकाळासी। कारण असे आम्हा येणे।।४५।। निरोप देताची तये वेळी। त्यजिला प्राण त्याने तत्काळी। जन्म जाहला म्लेंच्छ कुळी। राजा झाला विदुरानगरीचा।।४६।। ऐसे किती दिवस तरी। श्रीपादगुरु राहती कुरवपुरी। येणे होते पुढील अवतारी। म्हणोनी अदृश्य होती तेथेची।।४७।। होती आश्विन वद्य द्वादशी। मघा नक्षत्र होती सिंहराशी। श्रीपाद बैसले निजानंदेसी। अदृश्य जाहले गंगेत।।४८।।श्रीगुरु राहीले तेथ निर्गुणी। भक्तास्तव राहती

कुरवस्थानी। ध्याती तयांसी जे भावे करुनी। येई तयांसी प्रचिती।।४९।। याच कारणे दृष्टांत सांगतो तुज। काश्यपगोत्री वल्लभेष नामे द्विज। व्यापार करुनी तो उदर भरीत। प्रतिवर्षी येई श्रीपादक्षेत्री।।५०।। एके समयी आले तयाच्या मानसी। व्यापार उत्तम झालिया मजसी। भोजन देईन सहस्र ब्राह्मणांसी। ध्यान करी श्रीपाद वल्लभांचे।।५१।। शतगुण लाभ जाहला तयासी। आनंदला बहुत तो मानसी। कराया ब्राह्मण संतर्पणासी। द्रव्य घेऊनी निघाला।।५२।। ग्रामीचे तस्कर पाहती द्विजासी। म्हणती आम्ही येतो कुरवपुरासी। म्हणूनी निघती तया समवेती। वाटेत ते मारती द्विजासी।।५३।। भक्तजनांचा कनवाळु कैवारी। श्रीपाद त्वरीत पावला वेषधारी। त्रिशुळ घेऊनी तस्करास मारी। एक तस्कर तया शरण आला।।५४।। ऐकोनी त्या तस्कराची विनंती। श्रीपाद तया जवळ बोलाविती। तया हाती देऊनी विभूती। प्रोक्षी म्हणती विप्रावरी।।५५।। मंत्रोनी लाविता विभूती। सजीव झाला विप्र त्यासमयी। परी सूर्योदय झाला म्हणोनी। श्रीपाद अदृश्य जाहले।।५६।। विप्र पुसे मग तस्करासी। कोणी वधिले या मनुष्यांसी। तस्कर मग सांगे द्विजासी। रात्रीचा सकल वृत्तांत।।५७।। तस्कर सांगे त्या द्विजासी। आला होता त्रिशूळधारी तापसी। त्रिशूळे त्याने वधिले तस्करांसी। माते राखिले तुजकारण।।५८।। ऐकोनी तस्कराचे वचन। तस्करा पाशील आपुले द्रव्य घेऊन। श्रीपादस्थान

कुरवपुरी येऊन। देई भोजन तो सहस्र ब्राह्मणांसी ।।५९।। सिद्ध सांगे नामधारकासी। संशय न धरी तू मानसी। आहेत श्रीपाद कुरवपुरासी। अदृश्य रुपे ते राहती।।६०।। पुढे अवतार घेणे यासाठी। अदृश्य होती गुरुकृपा मूर्ती। अवतार पुढील श्रीनरसिंह सरस्वती। ऐक कथा तुज सांगतो।।६१।। पुढील अवतार कथा सांगती। पूर्वी कथा सांगितली विप्र स्त्रीची। शनिप्रदोषी पूजितसे ती शंकरासी। पंचत्व पावली तये वेळी।।६२।। पुढील जन्म जाहला तिजसी। कारंज नगरी उत्तर देशी। जन्मली ती वाजसनीय शाखेसी। नाव तिचे ठेवले 'अंबाभवानी'।।६३।। जाहली ती कन्या उपवर। होता शिवव्रती विप्र 'माधव' नाम। पित्याने तयासी दिधली कन्या दान। अतिप्रीती विवाह जाहला।।६४।। उभय ते पूजिती शिवशंकरासी। प्रदोष पूजा करती अती हर्षी। अतिविशेषी मंदवारी प्रदोषी। करीती पूजा अतिप्रेमे।।६५।। दंपती होती शुभाचारी। वासना अंबामनी पूर्वापारी। होता अंबाभवानी षोडशवर्षी। जाहली ती गर्भिणी।।६६।। उत्साहे जाता नवमासी। जाहली प्रसूत ती शुभदिवशी। पुत्र जाहला म्हणून हर्षी। आनंद निर्भर जाहले सर्व।।६७।। जन्म होताची तो बालक। ॐकार म्हणतसे अलौकिक। अभिनव म्हणोनी जन सर्व। आश्चर्य चकित जाहले।।६८।। ज्योतिषी सांगती जातक द्विजासी। हा अवतारी पुरुष विशेषी। वंद्य होईल सकल विश्वासी। चिंतामणि याचे चरण।।६९।। ऐसे सरती दहा

दिवस। नामकरण तयाचे  करती विशेषे। 'शाळिग्राम' तयाचे जन्मनाम। 'नरहरी' नाम त्याचे ठेविले।।७०।। न पुरे क्षीर बालकासी। माता होई दुःखी मानसी। बालक सव्यकर लावी स्तनासी। बत्तीस धारा क्षीर वाही।।७१।। ऐसे होता जाहले संवत्सर। बालक मुखे करी ॐकार। न बोलतसे तो अन्य शब्द। जनक जननी चिंता करती।।७२।। पुसती उपाय ज्योतिषासी। विचारती बोल का न ये यासी। काही उपाय असेल विशेषी। कृपा करुनी सांगावा।।७३।। सांगती उपाय ज्योतिषी तयांसी। आराधावे म्हणती कुलदेवतेसी। अर्कवारी अश्वत्थपर्णेसी। अन्न घालावे तीन वेळा।।७४।। काही केलीया न बोले बाळ। ॐकार शब्द उच्चारी केवळ। विस्मय करती लोक सकल। म्हणती नवल हे कैसे।।७५।। ऐसी जाहली वर्षे सात। जननी जनक चिंता करीत। बालक हस्ते घेऊनी देई लोखंड। सुवर्ण जाहले बावन्नकशी।।७६।। संज्ञा करुनी तो सांगे मातेसी। म्हणे बांधावी माझी मुंजी। येईल बोल मुंजी बांधताची। चिंता न करावी आपण।।७७।। यथाविधी केले तयाचे मुंजीबंधन। पिता देई गायत्री मंत्रोपदेश। आली माता भिक्षा घेऊन। नरहरी येई मातृभिक्षेस।।७८।। बालक नरहरी तिन्ही वेद म्हणून। घेई त्रिवार मातृभिक्षेस। माता आनंदुन देई आशीर्वचन। सकल जन विस्मय करती।।७९।। मातेस म्हणे मग तो ब्रह्मचारी। आम्ही करुन भिक्षा घरोघरी। करावा वेदाभ्यास मनोहारी। निरोप

द्यावा आम्हा आता।।८०।। ऐकोनी ऐसे पुत्राचे वचन। जाहली माता शोकमग्न। म्हणे तयासी करशील रक्षण। ऐशी आशा होती मनी।।८१।। बालके मस्तकी ठेविता कर। जाहले तिजसी मागील स्मरण। बालक तिज सांगे ब्रह्मज्ञान। द्यावा निरोप म्हणून विनवितसे।।८२।। पुत्रासी मात विनवी त्यावेळी। सन्यास कैसे आचरता बालपणी। चार आश्रम ख्यात धर्मशास्त्री। चारही आश्रम आपण आचरावे।।८३।। मुख्य आश्रम असे गृहस्थ। आचरण तयाचे करणे आहे श्रेष्ठ। मग नंतर सन्यास घ्यावा मुख्यार्थ। धर्मशास्त्रही असे सांगते।।८४।। माता म्हणे यज्ञादिक कर्म करुनीया। तदनंतर सन्यास घेणे न्याया। गृहस्थ वानप्रस्थानंतर सन्यास घ्यावा। अग्राह्य सन्यास बालपणी।।८५।। श्रीगुरु मग सांगती जननीसी। अनित्य हे शरीर तू जाणसी। म्हणोनी रहाटोनी पुण्य मार्गासी। पुण्य जोडावे इहजन्मी।।८६।। ऐकोनी पुत्राचे वचन। माता म्हणे देवा निरोपिले ज्ञान। परी जववरी होय एक सुत। देवा रहावे आम्हा समीप।।८७।। श्रीगुरु म्हणती मग हासोन। होता तुजसी पुत्र दोन। निरोप मजसी द्यावा संतोषून। बोल आपुले सत्यकरी।।८८।। होता दोन पुत्र मातेसी। बालक म्हणे जननीसी। आता निरोपावे आम्हासी। जाणे आम्हा कार्यासी।।८९।। मातापिता म्हणती तयासी। पावन केलेस तू आम्हासी। पुत्र म्हणे तुम्ही स्मरता मजसी। असेन मी तुम्हाजवळी।।९०।। निरोप घेऊन तये वेळा। श्रीगुरु

निघाले जाण्या मार्गा। नगर जन येती देण्या निरोपा। मातापिताही बोळविती।।९१।। वरदमूर्ती तो श्रीगुरुराणा। निघाला जाण्या बदरीकानना। पातला तो आनंदकानना। वाराणसी क्षेत्रासी।।९२।। श्रीगुरु आचरती तप दारुण। पाहुन चकीत होती जन। म्हणती हा ब्रह्मचारी ब्राह्मण। असे निर्लिप्त सर्वथा।।९३।। तेथे होता एक वृध्द यति। नाम तयाचे कृष्णसरस्वती। होता ब्रह्मज्ञानी महामुनी। विचार मनी तो करीतसे।।९४।। म्हणोनी आले तये जवळी। म्हणती बालका लोकानुग्रहासाठी। घ्यावे आपण सन्यासासी। शंकराचार्ये मार्ग सन्यास पुनर्स्थापिला।।९५।। ऐकोनी विनंती समस्तांची। श्रीगुरुमूर्ती सन्यास घेती। गुरुवृध्द कृष्ण सरस्वती। तयांपासूनी परियेसा।।९६।। गुरु नरहरींचे कृष्ण सरस्वती। नाम जाहले नरसिंह सरस्वती। समस्त वेदांचा अर्थ ते सांगती। जाहले वंदनीय काशी नगरात।।९७।। मग गुरु निघाले तेथोनी। सशिष्य आले बदरिकाश्रमी। अनंत तीर्थे तेथे पाहोनी। भूप्रदक्षिणा करीत आले गंगासागरी।।९८।। गंगासागरापासून यात्रा करीत। आले प्रयाग स्थानी गुरुराज। माधव नामे एक विप्र। श्रीगुरुंस तेथे भेटला।।९९।। दिला ब्रह्मज्ञान उपदेश त्यासी। देते जाहले चतुर्थाश्रम त्यासी। नाम दिले माधव सरस्वती। शिष्यांमध्ये अति प्रिय तो।।१००।।

।। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।।

अखंडमंडलाकारं व्याप्तं येन चराचरं। तत्पंद दर्शितं येन तस्मै श्री गुरवे नमः।
पंचामृत हे एकवटोनी देवी देवास अभिशिंचन करती। केल्याने अभिषेक तयांचा अमरत्व तव देसी।
घृत, दुग्ध, मधु, दधी व शर्करा या सम एकत्रित पंचामृत कथिती।
तद्वत आत्मा, मन, ज्ञानेंद्रीय, कर्मेंद्रीय व बुद्धीस देह पंचामृत बोलवती।
हा अध्याय पठन करीता दत्तगुरुस जो आळविती। तेणे आत्मशुद्धी होऊनी सुखसमृद्धी लाभती।
वास करुनी स्वगृहामध्ये गृहकलह नाशविती। परमानंद देऊनी या जीवास जो सुखविती।
करीता अध्याय हा पठण अपमृत्यु आदी दोष। नाश करीती ऋण अन् दारिद्र्याचा पाश।
असे हे गुरुनामाचे अमृत तीर्थ करीता प्राशन। देती भक्तास सुख करुनी दुःखांचे क्षालन।

## तिसरा अध्याय

## ।। आशीर्वादाध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नामधारक म्हणे सिध्दमुनिंसी। गुरुचरित्र कथामृत हे कल्पवृक्षची। अज्ञानांधकार जाईल निघुनी। होईल ज्ञानोदय गुरुकृपेने।।१।। गुरुचरिताची ऐसी कथा सांगुनी। जाहले धन्य ते सिध्दमुनी। तयांचीच कथा पुढे चालविण्या लागुनी। द्यावी मति या लक्ष्मणसुता।।२।। श्रीगुरुमुर्ति असता प्रयागक्षेत्री। शिष्य अपार लाभले तयांसी। मुख्य त्यामध्ये माधव सरस्वती। ऐसेची आणिक होते सहा शिष्य।।३।। सर्व शिष्यांसी घेऊनी समवेती। श्रीगुरु निघाले दक्षिणपंथी। क्षेत्रे पावन करुनी आले कारंजनगरी। झाली भेट जननी जनकांची।।४।। देखोनिया श्रीगुरुमूर्तिसी। नगरलोक समस्त जाहले हर्षी। घरोघरी बोलाविती त्यांस भिक्षेसी। करिती पूजा परोपरी।।५।। पवित्र ते गुरुंचे जनकजननी। उध्दरावे विनविती कर जोडूनी। श्रीगुरु सांगती तयांसी। सन्यासी पुत्र उध्दरी बेचाळीस कुळे।।६।। या कारणे लाभेल तुम्हा

अचलपद। होईल प्राप्त शाश्वत ब्रह्मपद। रहावे सुखी तुम्ही पुत्र पौत्रासह। पावाल अंती काशीक्षेत्री।।७।। त्यांची कन्या 'रत्नाई' नाम। श्रीगुरुस विनवी करण्या उध्दार। श्रीगुरु सांगती तियेला उपाय। करी पतिसेवा मनोभावे।।८।। श्रीगुरु सांगती पूर्व कर्मभोग। त्यागील पती अन् होईल कुष्ठ। उतारवयी प्राप्त होता तुज भोग। येई गंधर्वपुरी होईल भेटी।।९।। तेथुनी गुरु पातले नाशिकक्षेत्री। गौतमी उद्‌भव त्र्यंबक क्षेत्रासी। मुनि गौतमी महिमा सांगती। म्हणती साक्षात गंगा भूलोकीची।।१०।। महामुनी गौतम ऋषिश्रेष्ठ। लागे तयांसी गोहत्या पाप। निवारण्या पाप ऋषी करती तप। व्योमकेशी झाला प्रसन्न।।११।। गौतमऋषि गंगेची मागणी करती। शंकरे दिधला निरोप गंगेसी। पापक्षालनार्थ आली भूमंजळासी। नाम तियेचे झाले गौतमी।।१२।। श्रीगुरु आले वासरब्रह्मेश्वरासी। शिष्यांसह गंगेत स्नान करिती। पाहती प्राण देणाऱ्या विप्रासी। पूसती तयासी कारण।।१३।। सांगितली तयाने त्याची व्याधि। अन्नसेविता होई पोटदुखी। श्रीगुरु म्हणती गेली तव व्याधि। असे औषध आम्हापासी।।१४।। इतुक्यात विप्र एक आला स्नानासी। पाहीले तयाने गुरुवर्यांसी। येऊनी लागला गुरुचरणासी। सायंदेव असे नाम।।१५।। गंगादर्शने होई पापनाशन। चंद्रदर्शने होई तापहरण। परी लाभता श्रीगुरुदर्शन। पाप ताप दैन्य सर्व जाती।।१६।। पुनरपि नमस्कारी गुरुचरणांसी। श्रीगुरु आज्ञा देती तयासी। म्हणती या

उदर व्यथा पीडीत ब्राह्मणासी। घरी नेऊन भोजन द्यावे।।१७।। श्रीगुरु सांगती भोजन औषधी। हीच असे या ब्राह्मणासी। सांयदेव अंगिकारती गुरुवाक्यासी। विनविती आपणही यावे भिक्षेस ।।१८।। श्रीगुरु गेले तयाच्या घरी भिक्षेसी। षोडशोपचारे अर्पिती पूजा गुरुंसी। संतोषुनी श्रीगुरु वर देती। पुत्र पौत्रासह नांदाल हर्षी।।१९।। नाना पक्वान्न मिष्टान्न वाढती। गुरु आशीर्वादे विप्र सेवी प्रीति। जठरव्यथा झाली नाहीशी तयाची। श्रीगुरुंच्या कृपादृष्टिने।।२०।। आश्चर्य करती सकल जन। द्विजास वैरी होते अन्न।औषध झाले तयासी तेच अन्न। गुरुकृपा महिमा असे अपार।।२१।। तया गुरुभक्त सायंदेवासी। श्रीगुरु बोलती संतोषी। भक्त होतील तुझे वंशोवंशी। माझी प्रीती तुजवरी।।२२।। सायंदेव निवेदिती दुःख श्रीगुरुसी। सेवा करितो दुष्ट यवनाची। प्रति संवत्सरी मारी तो ब्राह्मणासी। बोलाविले असे मज आज।।२३।। जाता तयाजवळी घेईल माझा प्राण। परी भेटी जाहली तुमचे चरण। कैसे येईल मग मज मरण। नमितसे तो गुरुचरणांसी।।२४।। संतोषुनी श्रीगुरुमूर्ती। अभयंकर तयाचे मस्तकी ठेवती। म्हणती पुनरपि पाठवील आम्हापाशी। चिंता मुळी नसावी।।२५।। गुरुंचा वर घेऊन सांयदेव। आले जेथे होता यवन। कोपयुक्त त्या पाहून। जाहला विप्र भयचकित।।२६।। विमुख होऊन यवन गेला गृहात। करी सुषुप्ति होऊनी भ्रमित। स्वप्नी पाही शस्त्रे मारीतो विप्र। छेदन अवयवांचे करी तो।।२७।।

राजास द्विजाचे जाहले स्मरण। धरीले येऊनी त्याचे चरण। देऊनी तयासी वस्त्रेभूषण। निरोप राजा देतसे।।२८।। सांयदेव परतुनी येई गुरुंपाशी। नमन करुनी सांगे वृत्तांतासी। संतोषुनी आश्वासिती तयास गुरुमूर्ति। म्हणती तीर्थयात्रेस जातो दक्षिणेस।।२९।। सांयदेव विनवितसे गुरुंसी। येईन मी ही तुम्हा समवेती। भक्तवत्सल ऐसी तुमची ख्याती। सोडोनी आम्हा जाऊ नये।।३०।। श्रीगुरु तयेवेळी सांगती त्यासी। तीर्था जाणे आम्हा दक्षिणदेशी। पुनरपि देईन दर्शन पंचदशी वर्षी। सपुत्र कलत्र भेटा आम्हा।।३१।। हस्त ठेविती गुरु त्याच्या मस्तके। म्हणती गेली तुमची सकल दुःखे। संतोषवूनी तयासी श्रीगुरु निघाले। आले जेथे वैजनाथ महाक्षेत्र।।३२।। वैजनाथ क्षेत्र असे प्रख्यात। श्रीगुरु राहीले तेथे गुप्तरुपात। नामधारक विचारी सिध्दमुनिंस। गुप्तरुपे गुरु का राहीले।।३३।। गुरु महिमा पाहुनी भजती मंडळी। साधु असाधु सकल येती गुरु जवळी। स्वार्थास्तव शिष्य होऊ म्हणती सकळी। सांप्रत कलीयुग वर्ततसे।।३४।। याकारण श्रीगुरु राहीले गौप्यरुपी। सकल शिष्यांसी बोलावुनी। सांगती त्यांसी तीर्थ आचरोनी। यावे भेटीस श्रीशैल क्षेत्री।।३५।। 'बहुधान्य' नाम संवत्सरासी। येऊ आम्ही श्रीशैल्यासी। समस्त शिष्य लागती चरणांसी। ऐक शिष्या नामधारका।।३६।। शिष्य पूसती जावे कवण तीर्था। निरोप द्यावा श्रीगुरुनाथा। तुझे वाक्य दृढ चित्ता। धरुनी जाऊ स्वामिया।।३७।।

ऐकोनी वचन झाले गुरु प्रसन्न। तीर्थक्षेत्रे सांगती वर्णन करुन। गंगा यमुना आदि नदी तटाक। तैसेच करावे काशीप्रयाग।।३८।। सरस्वती शतद्रु नदी शरावती। देवनदी तैसेची मरुद्वृधा नदी। चंद्रभागा रेवती नदी गोमती। तटाक यात्रा करावी सांगती।।३९।। ऐसी विविध तटाके सांगती। रामेश्वर केदारतीर्थ पुष्करादि क्षेत्री। विधिवत कृच्छ स्नान आचरावे सांगती। ब्रह्म हत्यादि पापे नाश पावती।।४०।। ऐकोनी श्रीगुरुंचे वचन। शिष्य स्वयात्रेप्रती करती गमन। गुरुनिरोप प्रमाण मानुन। निघती सकळिक यात्रेप्रति।।४१।। सिध्द सांगतसे नामधारकासी। निरोप घेऊनी श्रीगुरुसी। शिष्य गेले तीर्थ यात्रेसी। राहीले श्रीगुरु गौप्यरुपे।।४२।। संवत्सर एक तया स्थानी। राहीले श्रीगुरु गौप्यरुपानी। तेव्हा गुरुंकडे आला ब्राह्मणमुनि। अज्ञान तम निवारिण्या विनवी तो।।४३।। मी तप करितो बहुत दिवस। स्थिर नव्हे मम मानस। गुरुसेवा न घडली बहुत दिवस। ज्ञानमार्ग मज सापडेना।।४४।। ऐकोनी त्या मुनीचे वचन। श्रीगुरु पुसती हांसोन। मुनि तू केवी झाला सांग मज। मुनि आपुली कथा सांगे।।४५।। सांगे गुरु होता आपणासी एक। परी अतिनिष्ठुर असे त्याचे वाक्य। गांजिले मज अकृत्य सेवा सांगुनी अनेक। कोप अधिक करी मजवरी।।४६।। न सांगे मज वेदशास्त्र व्याकरण। म्हणे नसे स्थिर तुझे अंतःकरण। ऐसे निष्ठुर बोले मज वचन। कोपोनी आलो तयावरी।।४७।। ऐकोनी श्रीगुरु म्हणती

तया लागुन। न पाहसी तू आपुले गुण। अल्पबुध्दि तू कैसे होईल ज्ञान। गुरुद्रोही तू असशी।।४८।। वदसी आपुले गुरुंचे दोष। अरे गुरु असे कामधेनु प्रत्यक्ष। सारुनी दूर तू आपुल्या गुरुस। कैसा आलासी आम्हा जवळी।।४९।। अरे संतोषविता आपुले गुरुसी। अष्टसिध्दिही होती दासी। वेदशास्त्र व्याकरण साध्य होती। होता पूर्ण गुरुकृपा दृष्टी।।५०।। मुनिसी त्या समजाविती श्रीगुरु। ब्रह्मा विष्णु हर स्वरुप गुरु। जनक जननी ही उपदेशकर्ता गुरु। करावी गुरुसेवा भक्तिभावे।।५१।। श्रीगुरु कथा सांगती तयासी। धौम्यऋषि अन् त्यांच्या शिष्यांची। 'आरुणी' 'बैद' 'उपमन्यु' नामे तयांची। सेवा करिती विद्येलागी।।५२।।'आरुणी' स सांगती धौम्यमुनी। आज तुवा जावोनी रानी। शेतीसी न्यावे तटाकपाणी। आरुणी धावत गेला रानी।।५३।। जाऊनी पाहे असे उदक वहात। परी शेतभूमी असे उन्नत। शिळा पाषाण टाकी उदकात। तरी वर न चढे वारी।।५४।। निश्चय केला तये मानसी। आपण आड पडुनी प्रवाहासी। वृत्तीकडे न्यावे आपण जलसी। उदकाआड तो स्वतः पडतसे।।५५।। दिवस गेला अस्तमानी। आरुणी न येई परतोनी। स्वतः शोधण्या जाती धौम्यमुनी। कष्ट आरुणीचे पाहती।।५६।। परम संतोषुनी तये वेळी। ऐक शिष्या बा आरुणी। तू ते विद्या आली सकळी। वेदशास्त्रादि व्याकरण।।५७।। दुसरा शिष्य बैद त्यासी। गुरु म्हणती वृत्ति रक्षावी अहर्निशी। वृत्ति रक्षुन आणावे

धान्यासी। अति हर्षी बैद गेला।।५८।। धान्य आणण्या गुरु देती गाडा। तया जुंपोनी एक रेडा। बैद आपण ओढी दुसरी कडा। आला तो वृत्ती जवळी।।५९।। दोन खंडी धान्य भरी गाडीसी। एकीकडे बांधुनी रेड्यासी। दुसरे जूं आपुले कंठासी। बांधुनी गाड ओढीतसे।।६०।। मार्गी चिखली रुतला रेडा म्हणोनी। आपण एकटाच ओढी गाडी। ओढीता आपुले गळा फांसी। पडुनी प्राण त्यजु पाहे।।६१।। ऐसे असता पातले धौम्यमुनी। आपुल्या शिष्यास पाहुनी। कृपा अत्यंत उपजली मनी। वर देती ते तयासी।।६२।। तिसरा शिष्य उपमन्यु म्हणुनी। तयासी सांगती धौम्यमुनी। चारावी गुरे नेऊनिया रानी। रक्षण करावे तयांचे।।६३।। माध्यान्ही क्षुधा लागता तयासी। शीघ्र गुरे आणिली घरासी। सांगती तयासी धौम्यऋषि। राखावी गुरे सायं पर्यंत।।६४।। राना जाई गुरे घेऊनी। चरती गुरे नदी तीरी। तेथे विप्र आश्रम असती। भिक्षा मागुनी भोजन करी।।६५।। धौम्यऋषि सांगती तयासी। द्यावी आणुन भिक्षा आपणासी। देतसे तो आणुन प्रतिदिवशी। नंतर भोजन करीतसे।।६६।। धौम्य पुसती कैसे निवारी क्षुधेसी। सांगे दुसऱ्या भिक्षेने करी भोजनासी। दोन्ही भिक्षा आणुनी मजसी। द्यावी ऐसे मुनि आज्ञापिती।।६७।। दोन्ही भिक्षा घरी देई आणुनी। राही क्षुधाक्रांत शिष्य रानी। गोवत्स पीता क्षीर गळे अवनी। हात पसरोनी पान करी तो।।६८।। धौम्य ऋषि पुन्हा पुसती तयासी। क्षुधा तू कैसी

निवारीसी। सांगे निवारी उच्छीष्ट क्षीर पिऊनी। गुरु प्रतिरोध करती त्यासी।।६९।। ऐसे कारणी नित्य नसे आहार। गुरा सहीत जात असता रानात। पाही गळते रुईचे क्षीर बहुत। ते पिण्या धरणीवर बैसला।।७०।। क्षीर घेत असता धणीवरी। क्षीर गेले त्याचे नयनी। तेणे तयाचे गेले नेत्र दोन्ही। हिंडतसे तो रानोवनी।।७१।। अक्षहीन फिरत असता रानात। गुरे शोधुनी तो पाहत। पडिला तो एका आडात। म्हणे आता बोल गुरुंचा येईल।।७२।। दिवस गेला अस्तासी। शोधित तया आले धौम्यऋषि। पाचारिती नामे स्वशिष्यासी। आडातून प्रत्युत्तर देई तो।।७३।। निरोप तया देती धौम्यमुनी। स्तवी पूर्ण देवता अश्विनी। तैसे तयाने स्तविता अश्विनी। दृष्टी आली त्यास देखा।।७४।। येवोनी बाहेरी तो नमन करी। धौम्यऋषि म्हणती आलिंगोनी। म्हणती तू शिष्य शिरोमणी। तुष्टलो मी तव भक्तीसी।।७५।। प्रसन्न होऊनी त्या शिष्यासी। हस्ते स्पर्शिती मस्तकासी। वेदशास्त्रादि विद्या आली त्यासी। असे फार थोर गुरुमहिमा।।७६।। कथा ऐकोनी अनुतप्त झाला ब्राह्मण। प्रसन्न जाहले श्रीगुरु आपण। मस्तकी ठेवती कर दक्षिण। ज्ञान तयासी जाहले।।७७।। आनंद जाहला ब्राह्मणासी। श्रीगुरु पाठविती त्यास गुरुपाशी। निरोप श्रीगुरुंचा घेऊन त्वरिती। गेला तो आपल्या गुरुपाशी।।७८।। श्रीगुरु आले भिल्लवडी ग्रामासी। नदी कृष्णा पश्चिम तटाकेसी। तेथे औदुंबर वृक्ष परियेसी। श्रीगुरु राहीले गुप्तरुपी।।७९।।

करवीर क्षेत्र नगरांत। ब्राह्मण होता एक वेदरत। आह्निक प्रमाण करी आचरण। कर्ममार्गी रत होता।।८०।। त्यासी जाहला एक सुत। मूर्ख असे तो उपजत। दैववशे जाहली मातापिता मृत। सकल जन तयासी निंदिती।।८१।। वैराग्य उपजले तया मानसी। आला भिल्लवडी ग्रामासी। अन्नोदक न घेता उपवासी। भुवनेश्वरी दर्शन करी तो।।८२।। धरणे धरुनी दिवस तीनी। बैसला तेथे अन्नोदक त्यजुनी। नव्हे काही स्वप्न तया लागुनी। छेदुनी जिव्हा वाही तो देवीचरणी।।८३।। त्यानिशी स्वप्न जाहले तयासी। सांगे त्यास पश्चिमी औदुंबर वृक्षतळी। आहे तापसी अवतार पुरुष चंद्रमौळी। तोच इच्छा पुरवील।।८४।। विप्र पोहुन गेला प्रवाहांत। आला तो गुरुसमीप। चरणावरी गुरुंच्या माथा ठेवून। करी स्तोत्र नानापरी।।८५।। संतोषुनी श्रीगुरु मूर्ति। तयाच्या मस्तकी हस्त ठेविती। ज्ञान तयासी झाले त्वरिती। जिव्हा आली तात्काळ।।८६।। लोह होय सुवर्ण परिस संपर्केसी। तैसी गुरु चरण होता स्पर्शी। आली अखिल विद्या तयासी। श्रीगुरु महिमा ऐसी असे।।८७।। क्वचित्काळ कंठोनी त्या स्थानी। श्रीगुरु होते गौप्य रुपानी। महात्म्य प्रकट झाले म्हणोनी। पुढे आले पंचगंगा संगमी।।८८।। शिवा भद्रा भोगावती। कुंभीनदी आणि सरस्वती। पंचगंगा ऐसी तयांची ख्याती। महापातक संहारिती त्या।।८९।। तेथे अमरापुर नामे ग्राम। स्थान ते असे अनुपम्य। औदुंबर वृक्ष

असे तेथ। देव असे अमरेश्वरु।।९०।। अमरेश्वर लिंग बरवे। त्यासी वंदुनी भक्तिभावे। पूजिता नर अमर होये। विश्वनाथ तोची जाणा।।९१।। तीर्थे तेथे असती अपरंपार। श्रीगुरु राहीले द्वादश वर्षे। भिक्षा करावया प्रतिदिन। जाती ते अमरापुर ग्रामी।।९२।। तया ग्रामी द्विज वेदाभ्यासक। त्याची भार्या असे पतिसेवक। शुक्लभिक्षा करी विप्र आपण। राहत असे सात्विक वृत्तीने।।९३।। वर्तता तेथे श्रीगुरु एके दिवशी। गेले भिक्षेस तया विप्र मंदिरासी। भक्तिपूर्वक तो पूजा करी षोडशी। भोजना असे घेवडे पत्र शाका।।९४।। प्रसन्न गुरु पाहती विप्राचे गृहांत। घेवडयाचा वेल होता उन्नत। श्रीगुरु छेदिती तया वेलाचे झाडमूळ। टाकोनी गेले गुरु संगमासी।।९५।। खिन्न झाली तया विप्राची नारी। विप्र तियेसी समजावुन सांगी। तारक म्हणुनी आला भिक्षेसी। हरील तोची दारिद्रय दोष।।९६।। द्विज खणिता झाला वेल मुळासी। लाभला तया कुंभ निधानेसी। आनंद झाला तया बहुवसी। कुंभ घेऊनी गेला घरांत।।९७।। म्हणती तो नर नव्हे योगीश्वर। असे साक्षात ईश्वरी अवतार। आम्हास भेटला दैन्यहर। आले ते संगमा गुरु दर्शनासी।।९८।। श्रीगुरु म्हणती तयासी। तुम्ही न सांगणे कवणासी। प्रकट करिता आम्हासी। नसेल लक्ष्मी तुमचे घरी।।९९।। सिध्द म्हणे नामधारकासी। श्रीगुरु महिमा असे ऐसी। भजावे तयासी मनो मानसी। कामधेनुच प्रत्यक्ष ते।।१००।।

।। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।।

अज्ञान तिमीरांधस्य ज्ञानांजन शलाकया।
चक्षुरुन्मिलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः।
माया जणू अंधार झाकवी ती सत्वास।
घेऊनी दीप ज्ञानाचा देती प्रकाश सृष्टीस।
मालोनी मालिका अज्ञानाची साजवी मुढ बुध्दिस।
गुरु हा परमश्रेष्ठ साध्य करवी सिद्धीस।
हा अध्याय करीता पठण होऊनी पालन या जीवाचे।
तस्कर अग्नी चोर आदी पासून अभय देती मोलाचे।
क्षेत्रपाल आजन्म करती रक्षण क्षेत्राचे।
तद्वत गुरु प्रेम देती येथे मातेचे।

चवथा अध्याय

## ।। परमआशीर्वादाध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जयजया सिध्द योगीश्वरा। सांगसी गुरुचरितामृतकथा। गुरुकथा नवशतीत वदविण्याला। द्यावी बुध्दि वैद्य गणेशा।।१।। नामधारकास सांगती सिध्दमुनी। राहीले गुरु गौप्य औदुंबरतळी। नामधारक विचारी अनेक वृक्ष त्यजुनी। का गुरुप्रीती औदुंबरावरी।।२।। सिध्द सांगती नामधारका। जेव्हा नरसिंह अवतार झाला। हिरण्य कश्यपु त्याने विदारिला। भिनले विष त्याच्या नखांसी।।३।। आली लक्ष्मी औदुंबर फळ घेऊनी। त्यांनी औदुंबरात नखे रोविली। शांत झाला उग्र विषाग्नी। औदुंबरास वर देती नरसिंह।।४।। सदा फळित तू होशील। कल्पवृक्ष नाम तुझे होईल। जे मनुष्यलोक तुज सेवतील। पापावेगळे होतील ते।।५।। तुझ्या ठायी करतील जपानुष्ठान। अनंत फळ होईल ज्ञान। तुझे जळात जे करतील स्नान। भागीरथी स्नान पुण्य लाभेल।।६।। कल्पवृक्ष तूच या कलियुगी।

लक्ष्मी शांती वसो तुजपाशी। म्हणोनी वर देती हृषीकेशी। ऐसा पवित्रवृक्ष औदुंबरु।।७।। गौप्यरुपे गुरु वृक्षतळी वसती। तेथे संधानी चौसष्ट योगिनी। पूजा करण्या येती माध्याह्नी। पूजा त्या करती विधिपूर्वक।।८।। आरोगोनी तयांच्या घरी। पुनरपि गुरु येती औदुंबरी। यति ग्रामात भिक्षा न करी। विस्मय द्विज वरांस वाटतसे।।९।। वर्तमान पाहण्या ते गेले संगमस्थानी। भय उपजले मनी माध्याह्नी। उपजता भय तयांच्या अंत:करणी। गेले परत आपुले स्थानासी।।१०।। गंगानुज राखीत होता वृत्ती। त्याने देखिले श्रीगुरुंसी। आल्या योगिनी गुरु पूजेसी। नेती त्या गुरुंसी गंगेत।।११।। दुसरे दिनी पुन्हा गंगाप्रवाहात। गुरु निघाले योगिनीं समवेत। गंगानुजही गेला तयां पाठोपाठ। पाहुन विस्मय तो करी।।१२।। देखोनी तया नरासी। श्रीगुरु पुसती का आलासी। विनवी नर तो स्वामियासी। सहज आलो दर्शनाते।।१३।। गंगानुज श्रीगुरु स्तुती करी। म्हणे आपणची आहा त्रिमूर्ती। संतोषुनी श्रीगुरु तया वर देती। म्हणती तुझे दैन्य गेले।।१४।। परी येथील वर्तमान पाहीलेसी। न सांगावे तू कवणासी। जया दिवशी प्रकट करिसी। तुज हानी होईल जाण।।१५।। ज्ञानवंत झाला तो गंगानुज। गुरुसेवा तो करी नित्य। पुत्रपौत्रासह जाहला श्रीमंत। महानंदे तो वर्ततसे।।१६।। एके दिनी त्याची इच्छा ऐकोनी। श्रीगुरु नेती तयासी मनोवेगी। त्रिस्थळी यात्रा तयासी करवोनी। आले परत त्या स्थानी।।१७।। प्रकट

झाली श्रीगुरु कीर्ति। निघाले श्रीगुरु तेथोनी। विनविती तया चौसष्ट योगिनी। न जावे आपण आम्हा सोडोनी।।१८।। श्रीगुरु म्हणती रहावे औदुंबरी। प्रकटार्थ जातो पूर्वेसी। ठेविता अन्नपूर्णा प्रीती करी। औदुंबर साक्षात कल्पवृक्ष।।१९।। साठी वर्षे पुत्र होई वांझेसी। हे तीर्थ ब्रह्म हत्या पापनाशी। सेवा करिता अंगहीन कुष्ठासी। देवासमान देह लाभेल।।२०।। गौप्यरुपे राहोनी औदुंबरी। प्रकटरुपे आले गाणगापुरी। राहीले तेथे श्रीगुरु प्रीतीकरी। प्रख्यात झाले परियेसा।।२१।। वर देऊनी योगिनींसी। श्रीगुरु आले गाणगापुरासी। कल्पवृक्ष म्हणती औदुंबरासी। कवणा झाला वरु सांगावा।।२२।। सिध्द सांगती शिरोळ ग्रामी। वेदरत विप्र गंगाधर नामी। पतिव्रता सुशील भार्या त्याची। परी पुत्र न वाचती तयांचे।।२३।। सांगती विप्र विद्वज्जन। पुत्र न वाचती याचे कारण। पूर्वजन्म दोष गुण। सविस्तर सांगती विप्र पत्नीसी।।२४।। रीण घेतले शौनक गोत्री विप्रा पाशी। मागितले तरीही न देशी। होता तो विप्र अत्यंत लोभी। आत्महत्या त्याने केली।।२५।। तोच झाला असे पिशाच। गर्भपात करी तो तुज। तुझे कर्म असे सहज। द्विजपत्नी विचारी उपाय।।२६।। सांगती करी त्यासी उध्दारगती। सोळावे कर्म करावे रीती। द्रव्य द्यावे तुम्ही एकशती। तया गोत्र द्विजासी।।२७।। असती तीर्थे पंचगंगा संगमेसी। आराधावे औदुंबर वृक्षासी। स्नान करुनी पापविनाशी। अभिषेकावे श्रीगुरुचरण।।२८।। आली द्विज

वनिता संगमासी। स्नान करुनी पाप विनाशी। सेवा करी ती तीन दिवशी। स्वप्नी विप्र मागे द्रव्य।।२९।। भयचकित झाली ती वनिता। पाहीले तियेने श्रीगुरुनाथा। श्रीगुरु पुसती त्या विप्रा। का मारिसी या स्त्रियेसी।।३०।। विप्र सांगे पूर्व जन्मकथा। पूसती का उपद्रव देसी भक्तजना। घ्यावे जे देईल विप्रवनिता। मुक्ती तुज लाभेल।।३१।। श्रीगुरु निरोप देती स्त्रीसी। जे असेल द्रव्य तुजपाशी। आचरी कर्म तया नामी। अभिषेक करी औदुंबरा।।३२।। केले तैसेची तियेने दहा दिवस। स्वप्नी आले श्रीगुरुनाथ। स्त्रीसी ते दोन नारिकेल देत। ओटी भरती तियेची।।३३।। पुत्र दोन झाले तिजसी। व्रतबंध करिती ज्येष्ठासी। चौलकर्म करु पाहती दुसऱ्यासी। आली व्याधी कुमारासी।।३४।। तया दिवशी अस्तमानी। पंचत्व पावला पुत्र तत्क्षणी। शोक करती जनकजननी। ऐका श्रोते एकचित्ते।।३५।।स्त्री म्हणे श्रीगुरु नरसिंह सरस्वती। भू मंडळी असे त्यांची ख्याती। औदुंबरतळी नित्य वसती। त्यांनी दिधले मज सुत।।३६।। म्हणोनी ती आठवी श्रीगुरुसी। म्हणे विश्वास केला मी तुम्हासी। सत्य संकल्प आपण असताची। घात का केला ऐसा।।३७।। द्विज ज्ञाते सर्व मिळोनी। सांगती त्या स्त्रियेलागुनी। न देई ती पुत्र प्रेतासी। प्रेत संस्कार करु न देई ती।।३८।। इतुकिया अवसरी। आला एक ब्रह्मचारी। सांगे तियेसी सविस्तारी। आत्मज्ञान तये वेळी।।३९।। ब्रह्मचारी म्हणे नारी।

मूढपणे दुःख तू न करी। कवण वाचला असे स्थिरी। या संसारी सांग मज।।४०।। मायापाशे वेष्टोनी। म्हणती पिता, सुत, जननी। कलत्र, मित्र,पुत्र तेणें गुणी। आपुले आपुले म्हणती मूढ।।४१।। विप्रस्त्री सांगे आम्ही दैवहीन। म्हणोनी धरीले श्रीगुरु चरण। अभय दिधले नाही मरण। म्हणोनी विश्वास केला आम्ही।।४२।। त्रयमूर्तीचा अवतारु। श्री नरसिंह सरस्वती असे गुरु। तेणे दिधला असे वरु। केवी असत्य होय सांग।।४३।। ब्रह्मचारी मग सांगे तिज। जेथे लाभला असे तुज वर। तेथेची समर्पी तू कलेवर। औदुंबर वृक्षातळी।।४४।। ऐसे वचन ऐकोनी। विश्वास जाहला तिचे मनी। पोटी पुत्र शव बांधोनी। घेऊनी गेली औदुंबराप्रती।।४५।। जेथे होत्या गुरुपादुका। आपटी शिर ती बालिका। रुधिरे भरल्या पादुका। आक्रोश करी ती नारी।।४६।। निद्रा नाही दिवस दोन्ही। शोक करिता जनकजननी। याम तीन होता रजनी। झोप आली तियेसी।।४७।। सुषुप्तीत पाही ती नारी। आला भस्मांकीत जटाधारी। आला तो औदुंबरा प्रती। पूसे शोक का करिसी सती।।४८।। भस्म काढोनी लावे प्रेतासी। मुख पसरी सांगे तियेसी। घालितो प्राण तव पुत्रासी। पुत्र तुझा सजीव होय।।४९।। झाली जागृत ती नारी। मनातीलच दिसे स्वप्नी। कैसा गुरु नरसिंह मुनी। भ्रांती आपणा झाली।।५०।। इतुक्यात पुत्रात जीव भरला। बाळ उठोनी बैसला। कडेवर घेऊनी बालकाला। सांगे वृत्तांत पतीसी।।५१।। म्हणुनी दंपती

दोघेजण। औदुंबरा प्रदक्षिणा करुन। साष्टांग करिती नमन। करती स्तोत्र नाना परी।।५२।। भाव असावा आपुले मनी। पूजा करावी श्रीगुरुचरणी। जे जे वासना ज्याचे मनी। त्वरीत होय परियेसा।।५३।। जया नाम कल्पतरु। प्रत्यक्ष जाणा औदुंबरु। जे जे मनी इच्छिती नरु। साध्य होई परियेसा।।५४।। नामधारक सिध्दमुनींसी म्हणे। मागे कथानक निरोपिले। श्रीगुरु गाणगापुरा आले। पुढे काय झाले सांगावे।।५५।। सिध्दमुनी म्हणती नामधारकासी। श्रीगुरु वसती संगमासी। भिक्षेस जाती गाणगापुरासी। नित्य नेमे माध्याह्न काळी।।५६।। त्या ग्रामी असे दरिद्री विप्र। तयाची भार्या पतिसेवक। तयापाशी असे महिषी एक। दंतहीन अतिवृध्द।।५७।। नेती तिज क्षारमृत्तिका आणण्यासी। त्याचा दाम देती विप्रासी। दारिद्र्ये तो विप्र कंठी काळासी। श्रीगुरु जाती तया घरी।।५८।। ब्रह्मदेवे आपुल्या करे। लिहिली असती जरी दुष्टाक्षरे। श्रीगुरुचरण स्पर्शिता शिरे। दुष्टाक्षरे ती शुभ होती।।५९।। नमन करुनी श्रीगुरुसी। विप्र वनिता म्हणे तयांसी। पति गेले भिक्षा याचण्यासी। तववरी आपण बैसावे।।६०।। श्रीगुरु म्हणती मग तिजसी। तुझ्या द्वारी असता महिषी। क्षीर का न देसी भिक्षेसी। नाही धान्य म्हणोनिया।।६१।। ऐकोनी श्रीगुरुवचन। विप्र वनिता म्हणे करुनी नमन। वांझ महिषी दंतहीन। वृध्दाप्य आले तियेसी।।६२।। श्रीगुरु म्हणती तियेसी। मिथ्या का ग बोलिसी। त्वरीत जावोनिया

महिषीसी। दोहोनी आणी क्षीर आम्हा।।६३।। श्रीगुरुवचन ऐकोनी। विप्रवनिता जाई दोहण्यासी। दुहिली महिषी क्षीर संतोषोनी। भरली दोन पात्रे तये वेळी।।६४।। क्षीर घेवोनी गेली घरात। तापवती झाली अग्नीत। घेवोनी आली क्षीरभरण। अति संतोषे करुनिया।।६५।। श्रीगुरुमूर्ति वर देती। लक्ष्मी राहील घरी अखंडिती। नांदाल श्रीयुक्त पुत्र पौत्री। गुरु जाती संगमस्थानी।।६६।। विप्र येता घरासी। सांगे वृत्तांत विस्तारेसी। महिमा थोर श्रीगुरु नरसिंहाची। परमपुरुष तोची सत्य।।६७।। उभय मनी विचार करिती। भेटी जाऊं कैसा यती। हाती घेवोनी आरती। गेले दंपती संगमासी।।६८।। भक्तिपूर्वक श्रीगुरुसी। पूजा करिती ते विधीसी। संतोषोनी श्रीगुरु तयांसी। पुनरपि वर देते झाले।।६९।। येणे परी तो द्विजवर। लाभला तयाला प्रसाद वर। कन्या-पुत्र-लक्ष्मी स्थिर। पूर्णायुषी जाहले पहा।।७०।। सिध्द म्हणे ऐक बाळा। श्रीगुरुची ऐसी अगम्यलीला। तोची विप्र प्रकट करिता झाला। पुसे वृत्तांत अधिपती।।७१।। ऐकोनी राजा वृत्तांत। गेला सपुत्र कलत्र गुरु भेटीस। करिती साष्टांग नमन श्रीगुरुंस। परम प्रीती भक्तिभावे।।७२।। संतोषोनी श्रीगुरु पुसती रायासी। आम्ही आहो यति तापसी। काय कारणे आला आम्हापाशी। सांगावे जी आम्हासी।।७३।। राजा वदे गाणगापुर महास्थान। स्वामी आपण करावे पावन। नित्य संगमी करा अनुष्ठान। परी वास असावा गावात।।७४।। मठ करुनी तये

स्थानी। असावे आम्हा उध्दारोनी। म्हणोनी लागे श्रीगुरुचरणी। भक्तिपूर्वक तो नरेश्वर।।७५।। श्रीगुरु मनीं विचार करती। भक्तजन तारणार्थ येणे रीती। निवास करणे आहे यास्थानी। पुरवु राजाचे मनोरथ।।७६।। ऐसा विचार करुन मानसी। निरोप देती ते राजयासी। जैसी असेल तुझ्या मानसी। भक्ती तैसे अवश्य करी।।७७।। श्रीगुरु वचन ऐकोनी। संतोष झाला रायामनी। बैसवोनी श्रीगुरु सुखासनी। समारंभे निघाला।।७८।। तया ग्रामी पश्चिम दिशेस। असे अश्वत्थ वृक्ष एक। त्यावरी ब्रह्मराक्षस भयानक। वसतसे तेथे एक।।७९।। ब्रह्मराक्षस तो महाक्रुर। मनुष्यमात्रा करी आहार। त्याचे असे भय थोर। म्हणोनी वोस गृह तेथे।।८०।। श्रीगुरु आले वृक्षाजवळी। ब्रह्मराक्षस लागे चरणी। म्हणे तारी तारी मज स्वामी। विनवणी तो करितसे।।८१।। कृपाळुमूर्ती श्रीगुरु। त्याचे मस्तकी ठेविती करु। मनुष्यरुपे होवोनी येरु। लोळतसे तो गुरुचरणी।।८२।। श्रीगुरु म्हणती तयासी। त्वरीत तू जाई संगमासी। स्नान करिता मुक्त होसी। पुनरावृत्ती नव्हे तुज।।८३।। श्रीगुरुंचे वचन ऐकोन। करी राक्षस संगमी स्नान। कलेवर सोडून तत्क्षण। मुक्त झाला ब्रह्मराक्षस।।८४।। कुमसी नामे ग्रामासी। होता एक तापसी। 'त्रिविक्रमभारती' नाम त्यासी। वेद तीन तो जाणतसे।।८५।। मानसपूजा तो नित्य करी। सदाध्यायी नरहरी। त्याणे ऐकिले गाणगापुरी। असे नरसिंह सरस्वती।।८६।। ऐके

त्याची चरित्र लीला। मनी म्हणे दांभिकमाळा। हा काय खेळ चतुर्थाश्रमाला। म्हणोनी मनी निंदा करी।।८७।। ज्ञानमूर्ती श्रीगुरुनाथ। सर्वत्रांच्या मनीचे जाणत। यतीश्वर निंदा करीत। म्हणोनी ओळखे मानसी।।८८।। श्रीगुरु म्हणती तयेवेळी। निघावे आजची तात्काळी। त्रिविक्रम भारती जवळी। जाणे असे कुमसीसी।।८९।। ऐसे परी श्रीगुरुमूर्ती। तया कुमसी ग्रामसी जाती। ते वेळी त्रिविक्रम महायती। करीत होता मानसपूजा।।९०।। मानसपूजा नरहरीसी। नित्य तो करी भावेसी। स्थिर नसे तया दिवसी। मानसी मूर्ति नरहरीची।।९१।। चिंता करी मनी यती। का बा न ये मूर्ति चित्ती। वृथा जाहले तपसामर्थी। काय कारणे म्हणतसे।।९२।। इतुके होता अवसरी। श्रीगुरुते देखिले दूरी। येत होते नदीतीरी। मानसपूजेचे मूर्तिरुपे।।९३।। साष्टांग नमन करावे म्हणोनी। जाऊनी लागे श्रीगुरुचरणी। सर्वची रुपे झाला प्राणी। दंडधारी यतिरुप।।९४।। समस्तरुपे एके परी। दिसताती दंडधारी। कवण लघु कवण थोरी। न कळे तया त्रिविक्रमा।।९५।। म्हणे न कळे तुझे स्वरुप ज्ञान। अविद्या माया वेष्टोन। निजस्वरुप आपण होऊन। कृपा करावी स्वामिया।।९६।। कवणाते नमू आपणा। कवणापुढे दावु करुणा। त्रयमूर्ति तूची ओळखे खुण। निजरुप व्हावे स्वामिया।।९७।। श्रीगुरु म्हणती यतीसी। नित्य आम्हा निंदा करिसी। परी आलो तुझ्या भक्तीसी। पूजा करिसी तू नृसिंहमूर्तीची।।९८।। ऐकोनी श्रीगुरुंचे

वचन। म्हणे कृतार्थ झालो आपण। दर्शन जाहले तुझे चरण। अनंत महिमा जगद्गुरु।।९९।। वर देवोनी त्रिविक्रम भारतीसी। राहवीले तेथेची तयासी। क्षण न लागता परियेसी। श्रीगुरु आले गाणगापुरी।।१००।।

।। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।।

स्थावरं जांगमं व्याप्तं यत्किंचित स चराचरम्।
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नमः।
गुरु वाक्य हे सिद्ध प्रमाण सोडणे हेतू मायेस।
शोषोनी दुःख दारिद्र्य चोचवी या पामरास।
करीता अध्याय हा पठण वा श्रवण।
भूत प्रेत पिशाच्च आदिक करीती तेथून पलायन।
होती करणी जारण मारणादि तसेच चेडादि बाधा जहाल।
तेवूनी दीप ज्ञानाचा सदैव रक्षोनी करी सांभाळ।

आईची माया पित्याचीच छाया देती गुरु भक्तास।
'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीसी आहे' हेची ब्रीद वाक्य जाण।

पाचवा अध्याय

## ।। वरदाअभय हस्तकाध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

सिध्दमुनी सांगती नामधारका। अलौकिक पवित्र गुरुकथा। जय जय श्रीगुरु स्वामी समर्था। नवशतीत उतरवावी गणेशाहस्ती।।१।। सिध्द म्हणती ऐक नामधारक। विदुरा नाम होते नगर एक। तयाचा महाक्रुर यवन नृप। होता ब्रह्मद्वेषी जीवहिंसक।।२।। सभेत आपल्या बोलावी विद्वज्जन। सांगे विप्रांसी म्हणा वेद। जो कोणी सांगेल वेद अर्थ। विशेष त्याची पूजा करु।।३।। म्हणे तो विप्र यज्ञी पशुहत्या करती। आम्हा म्लेच्छांते ते निंदिती। निंदा करी तो द्विजवरांची। वेद म्हणता विप्रांसी धन देई।।४।। यवन राजा द्रव्य देई म्हणोन। ऐकते झाले सारे विप्रजन। वेदशास्त्री अति होते निपुण। द्रव्यासाठी भेटती त्या यवना।।५।। ऐसे असता एक दिनी। त्रिवेदज्ञ लोभी विप्र दोनी।आम्ही वेद जाणतो म्हणूनी। सांगती त्या यवनराजा।।६।। म्हणती आम्हासम नच कोणी। जाणती जे वेद तिन्ही। आपल्या नगरीचे

ब्राह्मण आणवोनी। करावी चर्चा आम्हासी।।७।। राजा बोलावी विप्र विद्वज्जन। ऐकोनी म्हणती ज्ञानी जन। यांच्या परता त्रिवेदज्ञ आहे कोण। सन्मानी तयांना महाराजा।।८।। गर्विष्ठ ते तामसी ब्राह्मण। वृथा होतसे आमचे ज्ञान। शोधून एखादा विद्वज्जन। करु चर्चा तयासवे।।९।। आले ते विप्र कुमसी ग्रामी। तेथे त्रिवेदज्ञ त्रिविक्रम मुनी। त्यास म्हणती आलो चर्चेसी। त्रिविक्रम मुनी तयांसी म्हणती।।१०।। जरी असतो आम्ही वेदशास्त्रज्ञ। भोग भोगितो तुम्हा सम। तुम्ही उत्कृष्ट विद्वज्जन। तुम्हा सवे काय वाद।।११।। अभिमानी ते विप्र तामसी। जयपत्र मागती त्रिविक्रमासी। त्रिविक्रम आणी त्या विप्रांसी। गाणगापुरी श्रीगुरुं समोरी।।१२।। श्रीगुरु सांगती विप्रांसी।आम्ही तापसी सन्यासी। विप्र म्हणती आलो वादासी। नसता हारीपत्र द्यावे।।१३।। श्रीगुरु सांगती सोडा गर्व भ्रांत। काय जाणता तुम्ही वेदांत। तिन्ही वेदांचे आद्यन्त। श्रीगुरु तयांसी निरोपिती।।१४।। कृष्णद्वैपायन व्यास मुनी। वेदराशी विभागोनी त्यांनी। आपल्या चार शिष्यांस एकेक देऊनी। रक्षिले वेद तयांनी।।१५।। कल्पांता इतका दिवस असूनही। एकेक वेद शिकणे शक्य नाही। तुम्ही जाणता वेद चारही। अशक्य असे हे सर्वथा।।१६।। पूर्वी भारद्वाज नामे मुनी। तीन ब्रह्मकल्प तप केले त्यानी। ब्रह्मा प्रसन्न झाला तयासी। वरदान माग म्हणे तयासी।।१७।। भारद्वाज मग म्हणे ब्रह्मासी। वेद शिकवावे आपण मजसी।

ब्रह्मा म्हणे मिती नाही वेदांसी। आम्हासही वेद अगोचर।।१८।। ऐसे सांगोनी भारद्वाजासी। ब्रह्मा दाखवी वेदराशी। गिरीरुप ज्योतिर्मय त्या राशी पाहुनी। भयभीत झाला भारद्वाज।।१९।। म्हणे ब्रह्मासी मुनी भारद्वाज। वेद शिकणे आहे अशक्य। येईल जितुके तुमचे चित्तात। द्यावे तितुकेच आम्हासी।।२०।। ब्रह्मदेवे तया दिल्या मुष्टी तीनी। सांगती अभ्यास करा म्हणोनी। ऋक् - यजु - साम ऐसे मंत्र तिन्ही। त्याचे चार वेद तो अभ्यासतसे।।२१।। पैल, वैशंपायन, जैमिनी अन् सुमंत। असती हे चार व्यास शिष्य। व्यासमुनिंनी दिधला वेद एकेक। प्रत्येकास अभ्यासण्या।।२२।। ऐसे ते शिष्य चौघे जण। नम्रत्वे धरती व्यासचरण। कृपा करावी गुरुराया म्हणून। व्यासरायांसी विनविती ते।।२३।। व्यासमुनी सांगती पैल - शिष्यासी। सांगेन ऋग्वेद महिमा तुजसी। पठन करावे धर्म कर्मासी। ध्यान पूर्वी करोनी।।२४।। व्यास सांगती ऐक पैल। आयुर्वेद ऋग्वेदाचा उपवेद। गोत्र अत्री असे गायत्री छंद। ब्रह्मा असे दैवत त्याचे।।२५।। रक्तवर्ण आणि छंद गायत्री। नेत्र तयाचे पद्मसदृशी। विस्तृत ग्रीवा कंठ कुंचीत केशी। ऐसी वर्णिती ऋग्वेद मूर्ती।।२६।। चर्चा, श्रावका, चर्चक, श्रवणीया। पार - क्रम, जटा - शकट, दंड सातवा। शांखायनी, आश्वलायनी, शाकला, बाष्कला। मांडुकेया इत्यादि द्वादश शाखा।।२७।। व्यास यजुर्वेद विस्तार सांगती। वैशंपायन नाम शिष्यासी। धनुर्वेद उपवेद यजुर्वेदासी।

भारद्वाज गोत्र, रुद्र अधिदैवत।।२८।। कृश मध्य स्थूल ग्रीवा कपोल। वर्ण कांचनवर्ण मनोहर। नेत्र पिंगट शरीर ताम्र। पाच अरत्नी यजुर्वेद मूर्ती।।२९।। चरका, अह्वरका, कठा, प्राच्यकठा। कपिष्ठला, चारायण, वार्तांतवीर्या। श्वेताश्वतर मैत्रायणी एकादश। तयांसीही विविध भेद उपांगे असती।।३०।। ऐसा यजुर्वेद सांगितला विस्तारेसी। वैशंपायन विनवी व्यासांसी। सांगावी मूळ शाखा आम्हासी। व्यास तयाते निरोपिती।।३१।। मंत्र ब्राह्मण संहिता हेची मूळ। वरकड शाखा पल्लव। यज्ञादि कर्मक्रिया हेची मूळ।अभ्यास करावा विधींचा।।३२।। तिसरा शिष्य असे जैमिनी। सांगती तयासी सामवेद विस्तारोनी। उपवेद गांधर्व सामवेदासी। गोत्र तयाचे असे काश्यप।।३३।। विष्णु असे दैवत जगती छंद। शुचिवस्त्र क्षौमी दान्त। दान्त चर्मधारण सूर्यासम किरण। षडरत्नी दीर्घ सामवेद रुप असे।।३४।। आसुरायणी, वासुरायणी, वार्तांतवेय। प्रांजली, ऋग्वैन विध, प्राचीन योग्य। ज्ञानयोग्य, गौतम, जैमिनी। ऐसे नवभेद सांगती विस्तारोनी।।३५।। चवथा सुमंतु नामे शिष्यासी। अथर्वण वेद सांगती महर्षि। शस्त्रशास्त्र उपवेद तयासी। अधिदैवत इंद्र असे।।३६।। अनुष्टुप असे तयाचा छंद। कृष्णवर्ण कामरुपी क्षुद्र कर्म। स्वदार तुष्ट त्यासी नाम। विश्वसृजक साध्य कर्म।।३७।। जलमूर्ध्नी गालव रुप। असती तयासी नऊ भेद। नक्षत्र - विधि - विधान। संहिता - शांती ऐसे पाच कल्प।।३८।। पैप्पलाद, दांत,

प्रदांत। तौत, औत, ब्रह्मद पलाश। शौनकी, वेददर्शी, चारणविद्या नवम। ऐसी नामे नऊ भेदांची।।३९।। कलीयुगी या कर्मभ्रष्ट द्विज। म्लेंच्छापुढे बोलती वेदबीज। सत्त्व गेले याचिकारण। झाले विप्र मंदमती।४०।। विष्णु आपण परियेसी। पूजा करी ब्राह्मणांसी। आपुले दैवत म्हणे त्यांसी। वेदसत्त्वे करुनिया।।४१।। चतुर्वेदी म्हणविता आपणांसी। काय जाणता तुम्ही वेदांसी। जयपत्र मागता त्रिविक्रम भारतीसी। गर्वे आपणा भ्रम झाला।।४२।। ऐसे श्रीगुरु सांगती विप्रांसी। परी न ऐकती विप्र तामसी। म्हणती करु चर्चा तुम्हापासी। महत्त्व आमुचे तसेच राहील।।४३।। ऐसे विप्रवचन ऐकोनी। कोप करती श्रीगुरु मुनी। म्हणती जैसे असे अंतःकरणी। तैसी सिद्धि पावा आता।।४४।। इतुक्यात श्रीगुरु देखती नरासी। बोलवा म्हणती शिष्यांसी। श्रीगुरु याती पूसती तयासी। म्हणे मी 'मातंग' असे।।४५।। श्रीगुरु सप्तरेषा काढविती। एकेक रेषा लंघण्या सांगती। आला नर गुरु वाक्या सरसी। झाले ज्ञान तयासी।।४६।। प्रथम रेषा लंघिता पूसती तयासी। कवण कुळी जन्मलासी। पतित म्हणे आपण किरात वंशी। नाम आपुले 'बनराखा'।।४७।। त्याने दूसरी रेषा लंघिता। ज्ञान तयासी झाले पूर्वापरता। बोलू लागला अनेक वार्ता। करिती विस्मय सकळ लोक।।४८।। तिसरी रेषा लंघी म्हणती। त्यासी झाली जातिस्मृती। म्हणे आपण असू 'गंगासुत'। नदीतीरी वास आमुचा।।४९।। लंघिता त्याने रेखा

चतुर्थी। म्हणे आपण शूद्रयाती। जात होतो आपुले वृत्ती। स्वामी मज बोलाविले।।५०।। त्याने लंघिता रेखा पाचवी। झाले ज्ञान आणिक त्यासी। जन्म झाला वैश्य वंशी। नाम सांगे तो 'सोमदत्त'।।५१।। सहावी रेषा लंघिता। म्हणे आपण क्षत्रिय ख्याता। नाम आपुले विख्याता। 'गोदावरी' नाम आपुले।।५२।। सातवी रेषा लंघिता क्षण। अग्रयाती विप्र आपण। वेदशास्त्रादि व्याकरण। 'अध्यापक' नाम आपुले।।५३।। श्रीगुरु म्हणती तयासी। वेदशास्त्र अभ्यास म्हणसी। आले हे विप्र चर्चेसी। वाद करी गा या सर्वे।।५४।। अभिमंत्रोनि विभूती। त्याचे सर्वांगी प्रोक्षिती। प्रकाश झाला ज्ञान ज्योती। म्हणो लागला वेदशास्त्रे।।५५।। भयचकित विप्र थरथरा कापती। म्हणती आता काय गती। शरण येऊनी गुरुचरणी लोळती। म्हणती क्षमा करा स्वामिया।।५६।। श्रीगुरु तयांसी सांगती। तुम्ही क्षोभविला त्रिविक्रम भारती। आणिक अनेक महादोष असती। आपुली पापे भोगावी।।५७।। सांगती तयासी मग श्रीगुरुनाथ। बारा संवत्सर पावाल राक्षसत्व। अनुतप्त आपण झाल्याकारण। म्हणत असाल शुक्लनारायण।।५८।। तुमचे पाप शुध्द होता। द्विज एक येईल पर्याटता। पुढील वाक्य तुम्हा सांगता। उद्धार तुमचा होईल।।५९।। गुरुमूर्ती तयांसी निरोपिती। जावे आता गंगेसी। नदीतीरी जाताक्षणी। विप्र पावले पंचत्व।।६०।। पतीत झाला महाज्ञानी। म्हणे मी विप्र होतो पूर्वी। केवी जाहलो हीनयाती।

सांगावे श्रीगुरु स्वामिया।।६१।। श्रीगुरु म्हणती पतितासी। पूर्वी तू विप्र होतासी। श्रीगुरु, माता, पिता दूषिसी। यास्तव चांडाल जन्मलासी।।६२।। आता सांगतो तुज अधिक। स्नान संगमी मास एक। केलिया जाईल तुझा दोष। पुनरपि विप्रजन्म पावसी।।६३।। पतित म्हणे दर्शन सुधारसी। आपण जाहलो ज्ञानराशी। अभिमंत्रोनि आता मजसी। विप्रांमध्ये मिळवावे।।६४।। ऐकोनी तयाचे वचन। श्रीगुरु बोलती हासोन। तुझा देह जाति हीन। केवी विप्र म्हणती तुज।।६५।। पूर्वी ऐसा विश्वामित्र। क्षत्रियवंशी गाधिपुत्र। तपोबले करुनी पवित्र। विप्र म्हणवी आपणाते।।६६।। ब्रह्मयाची शत वर्षे। तप केले तयाने महाक्लेशे। इंद्रादि सुरवरांसी तो म्हणे। म्हणा मज 'ब्रह्मऋषी'।।६७।। देवऋषी म्हणती तयासी। आम्हा गुरु वसिष्ठऋषी। जरी तो म्हणेल तुज 'ब्रह्मऋषि'। आपण समस्त अंगिकारु।।६८।। वसिष्ठासी सांगे तो बळे। वसिष्ठ तयासी 'ब्रह्मऋषी' न म्हणे। कोप बहु केला तेणे। माराया वसिष्ठासी निघाला।।६९।। परी विचार करी मानसी। वधिन जरी मी वसिष्ठासी। कोणी न म्हणतील आपणासी। 'ब्रह्मऋषी' म्हणोनी।।७०।। पश्चातापे झाले शुध्द अंत:करण। वसिष्ठऋषी मग ओळखून। 'ब्रह्मऋषी' ऐसे म्हणोन। पाचारिती विश्वामित्रासी।।७१।। विश्वामित्र तया भोजना पाचारिती। शिरी सूर्यपचनी अन्न करण्या सांगती। विश्वामित्र सूर्यपाके अन्न करिती। देह भस्म झाला सूर्य किरणी।।७२।। ऐशा

अनुष्ठानी देह जाळोनी । नुतन देह धरी विश्वामित्र मुनी। विश्वमित्र मग 'ब्रह्मऋषी' म्हणोनी। जाहला प्रख्यात त्रिभुवनी।।७३।। श्रीगुरु इतके सांगत असता। आली तयाची पुत्र अन् कांता। ती पतिताजवळी येता। तयासी माराया धावे तो।।७४।। श्रीगुरु सांगती जावे घरासी। कर जोडूनी तो करी विनंती। ज्ञान होऊनी पुन्हा मागुती। कैसा होऊ हीन याती।।७५।। मग श्रीगुरु बोलावूनी लुब्धासी। उदक हस्ती देऊनी तयासी। स्नपन करी म्हणती पतितासी। होय तो आसक्त संसारी।।७६।। विभूती अंगची जाता धुऊनी। झाले अज्ञान त्याचे मनी। स्त्रीपुत्रांचे मुख मग पाहुनी। धावत गेला तयांजवळी।।७७।। विभूतीचा हा महिमा पाहोनी। विनंती करी त्रिविक्रम मुनी। सांगावा भस्ममहिमा विस्तारोनी। श्रीगुरु म्हणती ऐक बा।।७८।। पूर्वी कृतयुगी वामदेव योगी। प्रसिद्ध गुरु असे जगी। जटाधारी भस्म लावोनी सर्वांगी। वल्कल वस्त्र धारण करी।।७९।। हिंडता पातले ते क्रौंचारण्यात। तये स्थानी ब्रह्मराक्षस असे एक। भक्षितसे मनुष्यादि जीव अनेक। आला वामदेवासी भक्षावया।।८०।। राक्षसास पाहुन वामदेव निःशंक। जवळ तयाच्या पातला राक्षस। म्हणत बरवा लाधला ग्रास। येवोनी धरी आलिंगोनी।।८१।। आलिंगीता मुनीश्वरासी। भस्म लागले राक्षसासी। जाहले ज्ञान पातके जळोनी। झाला तो राक्षस महाज्ञानी।।८२।। राक्षस लागला मुनीश्वरचरणी। म्हणे तारा तारा मज मुनी। बुडालो

मी या संसार सागरी। उद्धरावे मज दातारा।।८३।। मी असे महापापी दुराचारी। ज्ञान जाहले तव स्पर्शमात्री। जणु आम्हासी उध्दरायासाठी। आला आपण वामदेवा।।८४।। वामदेव म्हणे सर्वांग माझे भस्मांकित। तुझे अंगा लागले क्वचित। झाला तुज ज्ञानप्रकाश। भस्म महिमा असे अपरंपार।।८५।। वामदेव सांगती राक्षसासी। विप्र होता एक द्रविडदेशी। सदा रत असे शुद्रिणीसी। तस्कर विद्येने पोटभरी।।८६।। तस्कर विद्या करिता निशी। शूद्रे वधिले त्या विप्रासी। ओढोनी नेले तेची निशी। टाकीले तया बहिर्ग्रामेसी।।८७।। श्वान एक बैसला होता भस्मावरी। गेला तो श्वान तया भक्षिण्यासी। त्यायोगे प्रेताचे ललाटी वक्षस्थळी। लागले भस्म सर्वांगी।।८८।। पाहुनी भस्म लेपित प्रेतासी। शिवदूत उचलोनी नेती त्यासी। जरी केले तयाने अनेक पापांसी। लाभे तयासी शिवलोक।।८९।। वामदेव म्हणती वेदशास्त्र संमतेसी। असे अनंत पुण्य त्रिपुंड्रेसी। सांगती त्रिपुंड्र महात्म्य विस्तारोनी। जाती त्याने महादोष।।९०।। ऋग्वेद अन् क्रियाशाली। प्रातःसवन असे ख्याती। महादेव - देव असे म्हणती। प्रथम रेखा येणे परी।।९१।। 'उ' कार दक्षिणाग्नी देवता। असे दुसऱ्या रेखेची देवता। यजुर्वेद नाम नभ सत्व जाणा। मध्यंदिन - सवन महेश्वर देव।।९२।। तिसरी रेखा मधिलेसी। 'म' कार आहवनीय परियेसी। परमात्मा दिव्य हर्षी। ज्ञानशक्ती तमो गुण।।९३।। तृतीयसवन परियेसी। सामवेद असे

त्यासी। शिवदैवत निर्धारिसी। तीनी रेखा येणे विधी।।९४।। ऐसे भावे नमस्कारुनी। त्रिपुंड्र लाविजे भस्मेनी। महेश्वराचे व्रत म्हणोनी। वेदशास्त्रे बोलताती।।९५।। वामदेव सांगती राक्षसासी। भस्म महिमा आहे ऐसी। अभिमंत्रोनि मग भस्मासी। देता झाला राक्षसासी।।९६।। लाविता त्रिपुंड्र भस्म कपाळी। ब्रह्मराक्षस जाहला तेजोमूर्ती। नमन करी मग योगीश्वरासी। आले विमान तत्क्षणेसी।।९७।। दिव्य विमानी बैसोनी। गेला स्वर्गासी तत्क्षणी। वामदेव महामुनींनी। दिधला तयासी परलोक।।९८।। सूत म्हणे ऋषीश्वरांसी। भस्म माहात्म्य आहे ऐसी। गुरुहस्ते असे विशेषी। तस्मात गुरुची कारण।।९९।। येणे परी सांगुनी त्रिविक्रमासी। नमन करुनी श्रीगुरुसी। त्रिविक्रम भारती गेला स्थानासी। झाले ज्ञान समस्तांसी।।१००।।

।। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।।

सर्व श्रुतीही शिरोरत्न विराजीत पदांभूजाः।
वेदांतांबुज सूर्यो तस्मै श्रीगुरवे नमः।
वेद हे आधार स्तंभ जणू या सृष्टीचे ।

जे माते समान रक्षण करती व पित्यासमान छत्र देती जिवास।
कोळोनी दु:ख दारिद्र्य सुखाचा पान्हा देती या पामरास।
करीता अध्याय हा पठन गुरु सुखविसी या जन्मास।
तृप्ती होऊनी जन्मजन्मांचे पितर।
सुखी करविसी तयास ठेवूनी तयांचा आदर।
रथामध्ये बैसवूनी शिष्यास गुरु हाकवी जीवन रथास।
देऊनी सुकिर्ती व राज्य या नरा नेती पैलतिरास।

## सहावा अध्याय

## ।। सच्चितानंदाध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जय जय श्री स्वामी समर्थ। गुरुचरित्र महापवित्र ग्रंथ। सुधारस असे हा प्रत्यक्ष। आणावा नवशतीत स्वामिया।।१।। नामधारक म्हणे सिध्दमुनिंसी। बोधिले ज्ञान प्रकाशी। पुढे कथा वर्तली कैशी। सांगावी मजसी दातारा।।२।। सिध्द सांगती गाणगापुरासी। असता श्रीगुरु नरसिंह सरस्वती। भक्त येती श्रीगुरुदर्शनासी। सकळाभीष्ट पावती ते।।३।। तेथे उत्तरदिशे माहुरस्थानी। गोपीनाथ नामे विप्र महाधनी। तयासी पुत्र होऊन मरती। आराधिती दत्त विप्र दंपती।।४।। जाहला तयांसी एक पुत्र। नाम ठेविले तयाचे दत्त। पाचवे वर्षी करती व्रतबंध। होता बारा वर्षे विवाह करती।।५।। असे नवरी सुंदर अती। सासुश्वसुरासी करी प्रीती। आनंदे वर्तता झाली षोडशी। व्याधी आली त्या पुरुषा।।६।। सांगती लोक महिमा ख्याती। नरसिंह सरस्वती श्रीगुरुमूर्ती। गाणगापुरी ते निवास करती। तया स्वामीच्या

दर्शना जावे।।७।। म्हणे मग ती सासुश्वसुरांसी। होईल आरोग्य गुरुदर्शन मात्रेसी। ऐसा निरोप घेऊन सकळिकांसी। निघाली गाणगापुरा तये वेळी।।८।। मार्गी अधिक झाला त्रिदोषी। आली ती श्रीगुरु दर्शनासी। श्रीगुरु गेले होते संगमासी। जावे तेथे म्हणून निघाली।।९।। पतीव्रता आली पती जवळ। पाहता जाहला अंतःकाळ। तत्क्षणी गेला तयाचा प्राण। आकांत दुःखे ती करितसे।।१०।। शोकअती करी ती नारी। तेव्हा भस्मांकित जटाधारी। रुद्र माळा भूषण अलंकारी। येऊनी जवळी उभा ठेला।।११।। तो सांगे त्या पतीव्रतेसी। का प्रलापिसी ऐसी स्थूळासी। जैसे लिखिले असे कपाळी। तया प्रमाणे सर्व घडतसे।।१२।। हा संसार अस्थिर असे नारी। कवण वाचला असे स्थिरी। माया मोहे कलत्र - पुत्र - पती। म्हणसी तू आपुला।।१३।। माया संबंधे सकल मायागुण। उपजे सत्व - रज - तमोगुण। कर्माचे अधीन संसार पूर्ण। त्रिगुणात्मक देह आपुला।।१४।। आपुले पूर्वजन्मार्जवासरसी। भोगणे होय सुख दुःखासी। आयुष्य, कलत्र, पुत्र अन् पती। ललाटी लिहीले असे ब्रह्माने।।१५।। बोधिता झाला तिज तापसी। ज्ञान झाले मग तियेसी। माथा ठेवूनी तया चरणासी। म्हणे उध्दरी मज स्वामिया।।१६।। नामधारकासी म्हणे सिध्द। सांगे योगेश्वर स्त्रीधर्म कर्म। पती असतानाचा पाळावयाचा धर्म। सांगे विस्तारूनी तियेसी।।१७।। तैसेच पती नसतानाचा धर्म। सांगे तिजसी विस्तारुन। म्हणे रहावे स्त्रीरहाटी

अंगिकारुन। सांगे सर्व धर्म तिजसी।।१८।। म्हणे अगस्तऋषी महामुनी। लोपामुद्रा महाज्ञानी त्यांची पत्नी। नसे कोणी अन्य पतिव्रता शिरोमणी। जाहले तेव्हा एक अपूर्व।।१९।। विंध्यपर्वत अगस्त्याचा शिष्य। तेथे महाशिखरे शोभायमान। एकदा तेथे गेला ऋषी नारद। बहु स्तुती तो करीतसे।।२०।। परी म्हणे तू नससी मेरु समे। ऐकूनी विंध्य कोप पावे। मेरु सरिसा होऊ ऐसे म्हणे। वाढता गेला स्वर्ग भुवनासी।।२१।। मग तयाच्या दक्षिण भागी। न दिसे सूर्य रश्मी। तेणे कारणे यज्ञकर्मे राहीली। समस्त ऋषी गेले इंद्रभुवनी।।२२।। ब्रह्मा सांगे विंध्य शिष्य अगस्तींचा। अगस्ती गुरु येता तया सन्मुखा। होईल नत तो तयांना नमिता। भूमी समान होतील शिखरे।।२३।। सांगतील तया मग अगस्तीऋषी। वाढू नको म्हणतील तयासी। येणे कारणे अगस्ति ऋषींसी। पाठवावे दक्षिणदेशी।।२४।। तेणे कारणे इंद्र अन् सर्व ऋषी। पातले अगस्ती आश्रमासी। करती स्तुती ते अगस्ती ऋषिंची। तैसेच वानिती लोपामुद्राते।।२५।। लोपामुद्रा असे पतिव्रता शिरोमणि। अरुंधती, अनसूया, शांडिल्यपत्नी। लक्ष्मी, पार्वती, शतरुपा, स्वयंभूसती। होत्या या पतिव्रता विख्यात।।२६।। पतिव्रतेचे आचरण सांगे विस्तारुन। पुरुष जेविता तो प्रसाद मानुन। करावे स्त्रीने मग भोजन। दिवस अखंड सेवा करावी।।२७।। अतिथिसी देऊनिया अन्न। अथवा धेनूसी पूजोन। करावे मग तिने भोजन। गृह निरंतरी निर्मळ राखावे।।२८।।

गुरु, धर्म, देव, तीर्थ, समस्ती। सर्व जाणावा आपुला पती। ऐसा निश्चय जिचे मानसी। पतिव्रता तीची जाणा।।२९।। चतुर्विध पुरुषार्थ देखा। स्त्रियेचेनी लाधे पुरुषा निका। ऐशी पतिव्रता स्त्री अधिका। पुण्यानुबंधे तया मिळतसे।।३०।। पुण्य जे घडे गंगास्थाने। लाधे केवळ सतीचे दर्शने। जाती सप्तजन्म पापें। महापापीही होय पावन।।३१।। नंतर विधवापणाचा आचारु। सांगता झाला देवगुरु। पुसती देव ऋषेश्वरु। ऐका श्रोते सावधचित्ते।।३२।। विधवा स्त्रीने विष्णु पूजावा नित्य। आपुला पुरुष हाची म्हणत। पुरुषरुप आठवूनी चित्त। विष्णुस्थानी आरोपिजे।।३३।। तीर्थयात्रा उपवास व्रत। विष्णुनिरोपें करणे पवित्र। अथवा गुरु द्विज असत। त्याचे निरोपे करावे।।३४।। वैशाख - माघ - कार्तिक मास। असे तेव्हा आचार विशेष। माघमासी माघस्नान तीर्थास। विष्णुस्मरण करुन करावे।।३५।। वैशाखमासी जलकुंभ दान। कार्तिकी करावे दीपाराधन। द्यावे ब्राह्मणा घृतदान। यथानुशक्त्या दक्षिणा द्यावी।।३६।। माघमासा मध्ये तिळघृतेसी। दान द्यावे ब्राह्मणासी। वैशाखमासी अरण्यासी। पोई घालीजे निर्मळोदकें।।३७।। अभिषेक शिवालयी ईश्वरावरी। गंध परिमळ पूजा करी। आणिक जलपात्र ब्राह्मणा देई। अनंत पुण्य असे देखा।।३८।। दीपदानाचा महिमा अनंत। दीपदानाचे फल असे अनंत। दानात सोळा भाग दीपदान। देवांसी सांगे बृहस्पती।।३९।। ऐसे उभय धर्म ऐकोनी। भक्तिभावे तया

नमस्कारोनी। म्हणे जाईन पतिसवे संतोषोनी। तारी माते स्वामिया।।४०।। ब्रह्मलिखित न चुके जाण। जे काही असेल कारण। तैसेच घडते असे श्रुतिवचन। दु:ख कोणी करु नये।।४१।। योगेश्वर म्हणे ऐसे करणे। जावे त्वरीत सहगमनें। अंत:काळ जवळ येता क्षणे। गुरुदर्शना जाई माये।।४२।। योगेश्वर म्हणती तियेसी। रुद्राक्ष बांधी गळसरीसी। दोनही प्रेत कर्णांसी। रुद्र बांधोनी दहन करावे।।४३।। आणिक एक सांगती तीज। गुरुदर्शना तू जाई सहज। तेथे रुद्रसूक्त म्हणती द्विज। श्रीगुरुचरण प्रक्षाळिता।।४४।। तेची तीर्थ आपुले देही प्रोक्षोनी। आणोनी प्रेतावरी प्रोक्षण करी। सुवासिनींसी वाणे देऊनी। मग तू जावे सहगमनी।।४५।। येणेपरी नदीसी गेली पतीसरसी। अग्निकुंड संनिध ठेविले प्रेतासी। बोलावूनी मग सुवासिनींसी। देती झाली वाणे देखा।।४६।। निरोप मागतसे हर्षी सकलांसी। म्हणे माझे पिता माता हरगौरी। जाते मी आता माहेरासी। प्रेमभावे निरोप द्यावा।।४७।। रुद्राक्ष बांधितसे ती प्रेतश्रवणी। कंठसूत्री ठेवीतसे ती दोनी। विनवितसे मग द्विजांसी। गुरुमूर्ति दर्शना जाऊन येते।।४८।। आज्ञा घेऊन मग द्विजांची। जाता म्हणे स्वामी नरकेसरी। अभाग्य आमुचे पूर्वापरी। म्हणोनी आपण आम्हा अव्हेरीले।।४९।। दुरोनीच ती साष्टांग नमन करी। 'सुवासिनी होई' गुरु म्हणती। पुन्हा एकवार ती नमन करी। 'अष्टपुत्री होई' म्हणती गुरु।।५०।। विप्र म्हणती मग

स्वामियासी। इचा पती पावला पंचत्त्वासी। पावला तो परंधामासी। सुवासिनी ही केवी होय।।५१।। म्हणती श्रीगुरु तयेवेळी। आणा प्रेत आम्हाजवळी। प्राण गेला कवणे काळी। पाहू म्हणती तया वेळी।।५२।। इतुक्यात आले विप्र चारी। गुरुंची पूजा करती मनोहारी। रुद्रसूक्त म्हणून अभिषेक करती। षोडोशोपचारे गुरुपूजा करती।।५३।। प्रेत आणले पाहुनी देखा। श्रीगुरु म्हणती विप्रलोका। म्हणती चरणतीर्थ प्रोक्षा। प्रेत सर्वांगी स्नपन करा।।५४।। श्रीगुरु निरोपे करती प्रेता स्नपन। पाहती गुरु सुधा दृष्टिने। प्रेत जाहले संजीवन। उठोनी बैसला तो तत्क्षण।।५५।। मग ती नारी अति आनंदुन। सांगती झाली सर्व विस्तारुन। उभे राहून मग ते दोघेजण। नमन करती श्रीगुरुंसी।।५६।। आनंदले मग सर्वजण। परी तयांमध्ये असे कुबुध्दि विप्र। म्हणे आमुच्या मनी संशय। 'ब्रह्मलिखित' सत्य कैसे म्हणावे।।५७।। श्रीगुरु म्हणती त्या विप्रासी। मागितले आम्ही ब्रह्मयापाशी। पुढील जन्मीची वर्षे मागितली। सांगती गुरु सर्व विस्तारुन।।५८।। रुद्राक्ष धारणाचे पुण्य अगम्य। लिंग पूजा समानेसी फळ। आणिक द्यावया नाही साम्य। श्रुति संमत परियेसा।।५९।। काश्मिरदेशी राजा भद्रसेन। सुधर्मा नाम तयाचा पुत्र। राजमंत्री सुत असे 'तारक'। परम सख्यत्व तयांमध्ये।।६०।। न लेती ते रत्नाभरण सुवर्ण। मानवी सुवर्ण लोहासमान। रुद्राक्ष माळां वाचून आणिक। न घेती अन्य अलंकार।।६१।।

एके दिनी आले पराशर ऋषी। राजा पाद्यपूजन करी हर्षी। राजा मग विनवी मुनीश्वरांसी। काय करावे माझ्या पुत्रासी।।६२।। ऋषी म्हणती मग राजेश्वरासी। त्यांची पूर्वजन्मीची कथा ऐशी। नंदीग्रामी होती वेश्यानारी। लावण्य सुंदरी तेजकांती।।६३।। बांधिले होते तिने कुक्कुट मर्कट मंडपी। रुद्राक्षमाळा लेववी ती तयांसी। बांधिला रुद्राक्ष कुक्कुट शिखेसी। शिकवी नृत्य ती तयांसी।।६४।। एके दिनी शिवव्रती वैश्य महाधनिक। आला तियेच्या मंदिरात। त्याचे करी असे रत्नखचित लिंग। पाहुनी लोभली ती वारवनिता।।६५।। वैश्य म्हणे सखींसी तिच्या। मुख्य वारवनिता जरी होईल मम कांता। होईल तीन दिवस माझी पतिव्रता। तरीच लिंग देईन तिजसी।।६६।। ऐकोनी तया वैश्याचे वचन। बोले मुख्य वारवनिता आपण। तुम्हाप्रमाणे दिनत्रय सत्य जाण। होईन मी तुमची कुलस्त्री।।६७।। वैश्य लिंग देवोनी वेश्येसी। म्हणे जतन करावे या लिंगासी। लिंग असे मज प्राण समानेसी। हानी होता प्राण त्यजीन।।६८।। ऐकोनी तयाचे ऐसे वचन। मंडपी जपून ठेवीले लिंग रत्न। क्रीडा करीत असता ते दोघेजण। नाट्यमंडपी अग्नी उठला।।६९।। अग्नित दग्ध झाले लिंग। कुक्कुट मर्कटांचे ही झाले दहन। वैश्य शोक करी पाहुन। अग्निप्रवेश करी तो वैश्य।।७०।। वेश्या करी अती दुःख। म्हणे वैश्य माझा प्राणेश्वर। निभावीन मी पतिव्रता धर्म। सहगमन करीन मी।।७१।। मग स्मरोनीया सर्वेश्वर।

केला तिने सूर्यासी नमस्कार। करुनी सर्व द्विजांसी नमन। उडी घाली अग्नीमध्ये।।७२।। तये प्रसंगी भस्मांकीत जटाधारी। धरिता झाला तिज वरचेवरी। प्रसन्न होऊनी तो शूलपाणी। वरमाग तिज म्हणतसे।।७३।। पराशर ऋषी म्हणे रायासी। तोच मर्कट मर्कटत्व त्यजून हर्षी। जन्मला असे तुझिया उदरी। कुक्कुट जन्मला मंत्रियाचे कुशी।।७४।। पूर्वसंस्कारे धारण करती रुद्राक्ष। दोघेही पुत्र असती ज्ञानवंत। पूर्वी अज्ञान असुनही होते शिवभक्त। त्यांचे पुण्य अमीत असे।।७५।। राया म्हणे भूत - भविष्य - वर्तमानी। त्रिकाळज्ञ तुम्ही असा ज्ञानी। सांगा स्वामी विस्तारुनी। भविष्य ह्या दोघा कुमारांचे।।७६।। ऋषी म्हणती होशील तू दु:खी। राजा म्हणे निरोपावे सकळी। उपाय काही करुन तात्काळी। दु:खावेगळा तुम्हीच कराल।।७७।। म्हणती तव पुत्राचे सरले आयुष्य। असती आता फक्त दिन सात। ऐकूनी राजा होई मूर्च्छित। रुदन करती सकळीक।।७८।। सांगे तया पराशर कृपानिधी। शरण जावे आपण शिवासी। असावे सदैव शिवध्यानी। तोच राखील तव पुत्रासी।।७९।। सांगती रायास रुद्राध्याय महात्म्य। होती पापे रुद्र जाप्ये दूर। लाभे संपत्ति, ज्ञान, आयुरारोग्य। अल्पायुषी होती दीर्घायुषी।।८०।। कुमारासाठी उपाय परियेसी। करावे दहा सहस्त्र रुद्रासी। स्नपन करी उमाकांत शिवासी। लाभेल पुत्रा दीर्घायुष्य।।८१।। राजाज्ञेने मग पराशर गुरु। निरोप देती द्विजवरु। तैसे बोलावून

ब्राह्मण सहस्त्रु। अभिषेकिती ते शिवासी।।८२।। ऐसे वर्तता होती दिन सात। कुमार पडला होऊन मूर्च्छित। पराशरे अभिषेक जल सिंचून। सावध केले तया क्षणात।।८३।। मग पूजन केले द्विजवरांसी। भोजन जाहले समस्तांसी। देऊन तांबुलादि दक्षिणेसी। संतुष्टविले सर्वाते महाराजाने।।८४।। तया समयी आला देवर्षी नारद। राजा अभिवंदुन तया पूसत। पूसे सांगा देखिले काही अपूर्व। त्रैलोक्यातून संचार तुमाचा।।८५।। नारद म्हणे महामृत्यु आला दूतांसह। तेव्हा सवेची येऊनी शिवदूत। मृत्युसी करुनी ते पराभूत। रक्षिते झाले तवपुत्रा।।८६।। ऐसा असे रुद्राध्याय महिमा। पूजा करावी गुरु ब्रह्मा। न भिणे लागे काळ यमा। श्रीगुरु सांगती दंपतीसी।।८७।। श्रीगुरु मग म्हणती तियेसी। स्त्रियांनी पतिभक्ती करावी हर्षी। देता उपदेश स्त्रीयांसी। विघ्न घडे मग मंत्रासी।।८८।। सांगती तिज शुक्राचार्य कथा। त्यांची प्रिय देवयानी नाम सुता। बृहस्पती पुत्र कच आला होता। विद्या शिकण्या शुक्राचार्यांपाशी।।८९।। देवयानी करी प्रीती कचावरी। दैत्य जाणती हा असे वैरी। वध करु पाहती नाना उपायी। पुनर्जीवित करती शुक्राचार्य।।९०।। दैत्य राख करुनी कचाची। पाजती मग गुरु शुक्राचार्यांसी। शुक्राचार्य देती मंत्र देवयानीसी। संजीवन मंत्र झाला सत्वहीन।।९१।। श्रीगुरु सांगती शिवव्रत महीमा। होती सीमंतीनी चित्रवर्मा सुता। पावेल वैधव्य चौदा वर्ष वय होता। ऐकूनी राजा

होई दुःखी।।९२।। याज्ञवल्क्य पत्नी मैत्रायणी। घरा आली तयांच्या पवित्रिणी। सीमंतीनी तिच्या चरणा लागुनी। उपाय तिजसी पूसतसे।।९३।। मैत्रायणी सांगे सीमंतीनीसी। करावे तू सोमवार व्रतासी। भक्तिभावे नमुनी मैत्रायणीसी। करीतसे सीमंतीनी सोमवार व्रत ।।९४।। चवदावे वर्षी चित्रांगद तिचा पती। नदीवरी गेला असता स्नानासी। नदीजला मध्ये तेव्हा बुडुनी। जाहला अंत तयाचा।।९५।। परी सीमंतीनीच्या व्रतप्रभावे। पातला तो पाताळी नागलोक। संतुष्ट तयावरी राजा तक्षक। पाठविले तयासी बहु सन्माने।।९६।। तक्षकासारखा मित्र मिळता। मिळाले तया पित्याचे राज्य परता। आनंदुन येई सह मातापिता। सीमंतीनी सह सर्व झाले हर्षित।।९७।। सीमंतीनीचे व्रत हे ऐसे। प्रति सोमवारी तिने उपवास केले। सोमवारी गौरीहरास पूजितसे। म्हणोनी पावली ती इष्टार्थ।।९८।। कथा ऐकूनी गुरुस वंदोनी। श्रीगुरुंचा प्रेमे निरोप घेऊनी। गेली दंपती ग्रामा परतोनी। ख्याती झाली सर्वत्र।।९९।। प्रतिवर्षी येती दर्शनासी। दंपती येती भक्तीसी। पुत्र तयांसी पाच शतायुषी। श्रीगुरु आशीर्वादे पावती सौख्य।।१००।।

।। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।।

ज्ञान शक्ति समारुढ तत्त्वमाला विभूषितः।
भुक्ति मुक्ति प्रदाताच तस्मै श्री गुरवे नमः।
मंथन करुनी मेरु संग देव आणि दैत्य।
प्राप्त करविले अमोल ते चौदा रत्न।
तद्वत तत्त्वासह मंथन करुनी या अज्ञान सागरात।
गुरूंनी प्रकटविले सुंदर मोहक ज्ञानरुपी अमृत।
करीता हा अध्याय सायंकाली पठण।
न ठेऊनी शंका होऊनी सद्‌गुरुसी शरण।
पावन करीत ते हे मौल्यवान रत्नमयी जीवन।
शत्रुभया पासून देती सदैव अभय।
करोनी ते सुदृढ मालवोनी कुसमय।
जय जय जय सद्‌गुरु तुम्हारी जय हो।
सदा ही तेरे चरणो में इस भगत को चरण सेवा में समालो।

## सातवा अध्याय

## ।। परमोच्चआनंदाध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्रीस्वामी समर्थ ब्रह्मस्वरुपी। तारक आम्हासी भवार्णवी। गुरुचरितामृत आम्हासी पाजूनी। करावे ज्ञानी या स्वामी भक्ता।।१।। सिध्दमुनी सांगती गुरुचरित्र कथा। सांगण्या ती सर्व स्वामी भक्ता। उतरवावी ती नवशतीत आता। द्यावी मति ह्या सिंधुसुता।।२।। असता श्रीगुरु गाणगापुरात। विरक्त वेदरत विप्र असे तेथ। न घेई कधी प्रतिग्रह परान्न। शुक्ल भिक्षे निर्वाह करीतसे।।३।। तयाची होती क्रोधवंती नारी। आराधना नित्य चाले त्या ग्रामी। जाऊ भोजना म्हणतसे ती नारी। विप्र कधीही न ऐकतसे।।४।। दु:खी कष्टी होतसे ती। जाई ती श्रीनृसिंहगुरुं प्रति। म्हणे भोजना न येई मम पती। आपणची तयासी सांगावे।।५।। श्रीगुरु आज्ञा देती त्या विप्रासी। म्हणती जावे पक्वान्न भोजनासी। ऐकूनी नमुनी म्हणे तो गुरुंसी। जाईन मी आपुल्या आज्ञेस्तव।।६।। परी ते भोजन करत्या समयासी।

श्वान सूकर दिसती तिजसी। सांगे मग ती आपुल्या पतीसी। श्वान उच्छिष्ट जेवलो आपण।।७।। येती उभय मग श्रीगुरुंपाशी। श्रीगुरु सांगती त्या स्त्रीसी। सदा दूषित होतीस पतीसी। क्षमा करावी म्हणून ती विनवितसे।।८।। श्रीगुरु निवेदिती त्या उभयतांसी। अन्न घ्यावे गुरुभवनादिकी हर्षी। जेवावे शिष्य गृही आपुल्या श्वसुरी। अडल्या विप्रा घरी करावे भोजन।।९।। अन्यथा सर्वथैव वर्जावे परान्न। घेऊ नये धन लोभिष्टाचे अन्न। माता पितृ दोषीयाचे घरचे अन्न। न घ्यावे असे दोष ऐसे अन्नास।।१०।। तदनंतर श्रीगुरु निवेदिती। आचारधर्म जो सांगितला पराशर ऋषी। ब्रह्मचारी- गृहस्थ - वानप्रस्थ - यतिश्वंरासी। असे जो आचरधर्म पाळण्यासाठी।।११।। गायत्री मंत्र महत्त्व विस्तारुनी। सांगती गुरु त्या विप्रालागुनी। नित्य गृहस्थ धर्म पाळावा म्हणूनी। सांगती आचार आसूर्योदय सूर्यास्त पर्यंत।।१२।। नंतर सांगती देवपूजा विधान। गृह आपुले नित्य संमार्जुन। हिरण्य - रौप्य - ताम्र वा मृत्तिका पात्र। घेऊन करावे संमार्जन विधिपूर्वक।।१३।। रंगमालिका सुंदर नित्य घालोनी। निर्मळ असावे देवता भुवनी। मग शुभासनी पवित्र बैसोनी। भक्तिभावे देवपूजा करावी।।१४।। विप्रकुळी जन्म लाभे जयासी। पूजा न करिता जो जेवी हर्षी। पाप लागतसे तया नरासी। जो न करी संध्या नित्य।।१५।। म्हणती कलिप्रवेश होता नर। न करिती ते अंतःकरण स्थिर। उत्पत्ति करीतसे शार्ङ्गधर। समस्त

लोक उध्दरावया।।१६।। शालिग्राम चक्रांकितेसी। प्रकाश केला असे हृषीकेशी। तीर्थ तयाचे घेता परियेसी। समस्त पापे नाश पावती।।१७।। श्रीगुरु निरोपे घ्यावे शूची आसन। पूजा करी जे काष्ठ पाषाण। तेची होती देव आपण। प्रसन्न होती त्वरीतेची।।१८।। पुरुष सूक्तादि रुद्रेसी। श्रुतिमार्गे करुनी न्यासासी। स्नपन करावे देवांसी। नंतर बैसवावे शुभासनेसी।।१९।। 'तंयज्ञमि' ति मंत्रेसी। वस्त्रे द्यावी देवांसी।'तस्माद्यज्ञात्' मंत्रेसी। यज्ञोपवीत अर्पण करावे।।२०।। तस्माद्यज्ञात्सर्व हुतऋचः मंत्रे। गंधाक्षत वहावे भक्ति मंत्रे। तस्मादश्वा अजायंत मंत्र म्हणत। नाना पुष्पे वहावी।।२१।। दुर्वा अर्पण करावी गणेशासी। बिल्वपत्र अर्पावे शिवासी। विष्णुसी अर्पण करावी तुलसी। नानापुष्पे अर्पावी यथाविधी।।२२।। यत्पुरुषं मंत्रेसी। सुगंध धुपावे परिमळेसी। 'ब्राह्मणोस्ये' ति मंत्रेसी। एकारती करावी मनोभावे।।२३।। 'चंद्रमामनसो' ति मंत्रेसी। नैवेद्य द्यावा परिकरेसी। तांबूल देता मंत्रासी। 'नाभ्यासासी' म्हणावे।।२४।। सुवर्णपुष्प नीरांजन। 'सप्तास्ये' ति मंत्रे करुन। 'वेदामहे' ति मंत्रे करुन। पुष्पांजली अर्पण करावी।।२५।। 'धातापुरस्तात्' मंत्रेसी। नमस्कारावे देवासी। अतिसन्मुख पृष्ठदेशी। गर्भगृही करु नये।।२६।। नमस्काराचे विधान। सांगतसे श्रीगुरु वर्णुन। अपसव्य देवा प्रदक्षिण। करुनी नमन करावे।।२७।। ऐसे परी देवपूजा। करावी भक्तीने सांगती द्विजा। अन्न संस्कार व्हावया काजा।

वैश्वदेव करावा ।।२८।। वैश्वदेव समयासी। अतिथी आलिया घरासी। चोर चांडाल होय हर्षी। पूजा करावी मनोभावें।।२९।। ब्राह्मणाचा संपूर्ण आचार। जो सांगता झाला पराशर। तोच निवेदिती श्रीगुरुवर। म्हणती येणेपरी आचरण करावे।।३०।। ऐसे करीता इच्छा कामना। होतील निरुती सत्य जाणा। कन्यापुत्र नांदती सगुणा। संदेह न धरावा मानसी।।३१।। श्रीगुरुं कडून वर लाधोनी। विप्र गेला संतोषूनी। होता तैसाची आचरोनी। सकलाभीष्टें लाधली तया।।३२।। श्रीगुरुंची समाराधना नित्य। करीत होते भक्त अनेक। समाराधना नाही म्हणून। नसे दिवस एकही।।३३।। ऐसे असता एक दिवशी। द्विज एक काश्यप - गोत्री। आला होता दर्शनासी। अती दरिद्री असे तो।।३४।। संकल्प करुनी तो ब्राह्मण। श्रीगुरुसी भिक्षा करवीन आपण। त्रिवर्गापुरतेच तंडुल - कणिक। तेवढेच सोपस्कार घेऊन आला।।३५।। सर्व असे त्याचे वस्त्री बांधिले। नेऊन तयाने मठात ठेवीले। भक्ते आणिक त्यासी बोलाविले। गेला तो द्विज भोजनासी।।३६।। नित्य घडे ऐसेची त्यासी। भक्त लोक येती आराधनेसी। आराणूक न घडे त्यासी। नित्य जेवी तो समाराधनी।।३७।। एकासीही नव्हे पुरे अन्न। श्रीगुरु शिष्य बहुत जन। केवी समाराधना करील ब्राह्मण। म्हणून समस्त हासती तया।।३८।। मास तीन क्रमिल्यावरी। समस्त मिळोनी द्विजवरी। परिहास त्याचा करती अपारी। श्रीगुरुमूर्तिंनी ऐकीले

ते।।३९।। बोलाविती ते त्या ब्राह्मणासी। आजी भिक्षा करावी आम्हासी। स्वयंपाक करी तू वेगेसी। म्हणती श्रीगुरु कृपासिंधू।।४०।। ऐकोनी श्रीगुरुंच्या बोला। संतोष अपार द्विजा झाला। चरणावरी माथा ठेविला। हर्षे गेला आयतीसी।।४१।। श्रीगुरु म्हणती द्विजांसी। शीघ्र जावे आंघोळीसी। तुम्ही आज जेवावे येथेची। ब्राह्मणासी स्वयंपाक करण्या सांगती।।४२।। म्हणती ब्राह्मणांसहीत आम्हासी। जेवू वाढी गा तू परियेसी। विप्र म्हणे आपला निरोप माझे शिरसी। ब्राह्मणासहीत जेवू वाढीन।।४३।। श्रीगुरु सांगति आणिक शिष्यांसी। तात्काळी करा चार सहस्त्र पत्रावळी। उभा होता ब्राह्मण जवळी। म्हणती बोलावी सर्वांसी सपुत्र कलत्र।।४४।। हो कां बरवें बरवें म्हणती। शिष्य सकळ पत्रावळी करती। ब्राह्मण श्रीगुरुपूजा त्वरिती। करिता झाला उपचारे।।४५।। श्रीगुरु स्वयंपाक आणविती जवळी। म्हणती मग ते ब्राह्मणासी। आपुले वस्त्र देऊनी झाकण्या सांगती। श्रीगुरु प्रोक्षिती उदक अन्नावरी।।४६।। वाढीले अन्न समस्त पंक्तीसी। सहगुरु सर्व जेविती हर्षी। भक्ष्य परमान्न पत्रशाका वाढती। चार सहस्र जेविले समस्त।।४७।। भोजन समस्तांचे झाल्यावरी। श्रीगुरु त्या द्विजाते पाचारी। वर देती होईल दारिद्र्य दुरी। पुत्र पौत्र होतील तुज।।४८।। समस्त म्हणती श्रीगुरु परब्रह्म। म्हणूनीच केले अन्नपुर। होते तीन अडीच शेर अन्न। चारी सहस्र जेविले केवी।।४९।। सिध्द सांगती आणिक

एक कथा। पुढे अपूर्व वर्तले ऐका। साठी वर्षे वांझेसी एका। पुत्र झाला परियेसा।।५०।। सोमनाथ नामे आपस्तंब ब्राह्मण। पत्नी असे तयाची गंगानाम। झाली तिजसी वर्षे साठ। पुत्र नाही तिचे कुशी।।५१।। पतिव्रता ती सती। नीरांजन प्रतिदिवशी। आणोनी करी श्रीगुरुसी। वर्तत होती बहुत दिवसी।।५२।। श्रीगुरु म्हणती तियेसी। नीरांजन आणतेस प्रतिदिवशी। काय इच्छा तव मानसी। सांगे त्वरीत विस्तारुन।।५३।। ती म्हणे आता पुरे हा जन्म। पुढे मिळो उत्तम जन्म। पुत्रवंती व्हावे आपण। विनवितसे ती श्रीगुरुंसी।।५४।। म्हणती नित्य आरती आम्हासी। भक्तिपूर्वक तू करीसी। जाहलो आम्ही बहु संतोषी। कन्या - पुत्र होतील तुज।।५५।। ती म्हणे साठी वर्षे जन्मासी। जाहली स्वामी परियेसी। होत नाही विटाळसी। माते कैचे पुत्र होती।।५६।। श्रीगुरु म्हणती आमचे वाक्ये करी। नित्य जावे तू संगमातीरी। अमरजा वाहे तेथे निरंतरी। भीमरथी संगमात।।५७।। तेथे अश्वत्थ असे गहन। जातो आम्ही अनुष्ठाना। सेवा करी वो एकमनें। आम्हासहीत अश्वत्थाची।।५८।। अ -कार शब्द मूळ स्थान। स्कंध शाखा उ - कार जाण। फळ पुष्प म - कार वर्ण। अश्वत्थ मुख अग्निकोणी असे।।५९।। एकादश रुद्रादिक अन् अष्टवसु। ते स्थानी समस्त देवगुरु। त्रयमूर्तिंचा तेथे निवासु। भजता काय सिध्दि नोहे।।६०।। श्रीगुरु निरोप जेणें परी। तैसी सेवा करी ती नारी।

येणेंपरी तीन रात्री। आराधी श्रीगुरु सहीत अश्वत्थासी।।६१।। स्वप्नी येऊनी सांगे विप्र। जाई ग तू गाणगापुरात। तेथे असती श्रीगुरुनाथ। सप्तप्रदक्षिणेसह नमी त्यांसी।।६२।। श्रीगुरु देती फळे दोनी। भक्षण करी म्हणती संतोषूनी। काम्य होईल सत्य झणी। कन्या - पुत्र दोघे होतील।।६३।। साठी वर्षे वांझेसी। कन्या-पुत्र जाहले परियेसी। सिध्द म्हणे नामधारकासी। ऐसी असे कृपा श्रीगुरुंची।।६४।। पुढे ऐक एक विचित्र कथा। गाणगापुरी श्रीगुरु असता। आपस्तंब कुष्ठी विप्र आला। नाम होते तयाचे नरहरी।।६५।। श्रीगुरु म्हणतसे तो विप्र। असेल मी केले पाप असंख्यात। त्यायोगे हे दु:ख मी भोगीत। जन्म पुरे आता मज।।६६।। त्याचे करुणा वचन ऐकोनी। भक्तवत्सल श्रीगुरु मुनी। एक काष्ठ देती आणवोनी। जावुनी रोवा म्हणती भीमातीरी।।६७।। सांगती तया नित्य स्नान करोनी। अश्वत्थ भक्तिभावे पूजूनी। द्यावे काष्ठास जल कलश दोनी। स्नपन करी तिन्ही वेळी।।६८।। जेणे दिनी पर्णे येतील काष्ठासी। पाप गेले तुझे दोषही। होईल अंग बरवे तुजसी। विप्र त्यापरी आचरीतसे।।६९।। अन्य शिष्य सांगती गुरुंसी। सेवा करी विप्र काष्ठासी। राहीला सात दिन उपवासी। उदकही मुखे घेत नाही।।७०।। ऐकोनी शिष्यांचे वचन। निरोप देती श्रीगुरु आपण। जैसा भाव आणि अंत:करण। तैसी सिध्दी पावेल।।७१।। अयोग्य अथवा ज्ञानवंत। म्हणोनी न पहावा अंत। गुरु

त्रैमूर्ती मनी ध्यात। सेवा करावी भक्तिभावे।।७२।। मग श्रीगुरु सांगती शबर कथा। लिंग देई तयासी धनंजय राजा। सांगे लिंगपूजा विधान तत्त्वता। शबर राजासी गुरु मानी।।७३।। तयाने सांगितले होते म्हणून। नैवेद्य कधी न अर्पी भस्मावीन। त्यासाठी शबर स्त्रीने प्राण त्यागून। दिले भस्म नैवेद्यासी।।७४।। शिवशंकर जाहला प्रसन्न। निजरुपे प्रकट झाला तत्क्षण। शबर दंपती नमिती चरण। शिव तयांसी देई वरदान।।७५।। जैसा भाव तैसी सिध्दी। होईल सत्य त्रिशुध्दी। श्रीगुरुनाथ कृपानिधी। आले त्वरीत संगमासी।।७६।। कमंडलु जल शिंपडले काष्ठासी। पल्लव तया आले परियेसी। औदुंबर वृक्ष दिसे ऐसी। जाहले आश्चर्य समस्तांसी।।७७।। काष्ठ आता दिसे औदुंबर। सुदेही जाहला तो विप्र। दिसे सुवर्ण देही तो नर। गेले कुष्ठ तात्काळी।।७८।। समस्त लोक विस्मय करिती। श्रीगुरुंते समस्त नमस्कारिती। नानापरी स्तुती करती। भक्तिभावे करुनीया।।७९।। नृसिंह सरस्वती वसती गंधर्वपुरी। श्रीगुरु भक्तवत्सल अवधारी। श्रीगुरुंचा थोर महिमा ऐकूनी। आला सायंदेव तव पूर्वज।।८०।। करसंपुष्टे नमस्कारुनी। स्तुती तयांची करुनी एकोध्यानी। त्रैमूर्ती तुम्हीच असा म्हणूनी। वंदितसे श्रीगुरु स्वामिया।।८१।। संतोषोनी श्रीगुरुमूर्ती। तया सायंदेवा आश्वासिती। माथा तयाच्या हस्त ठेवती। परम भक्त तूची आम्हा।।८२।। तया विप्र - सायंदेवासी। श्रीगुरु पुसती प्रियेसी। स्थान तुझे कवण

देशी। कलत्र पुत्र कोठे असती।।८३।। सायंदेव सांगे श्रीगुरुंसी। कन्या - पुत्र - बंधुजन असती। तुझे कृपेने समस्त क्षेमी। असो देवा कृपासिंधु।।८४।। आणि सेवा करीत श्रीचरणापाशी। असेन स्वामी परियेसी। ऐसा दृढ माझे मानसी। निर्धार असे स्वामिया।।८५।। भक्तांसह बैसले असता अश्वत्थासी। श्रीगुरु मनी विचार करती। उठविती वारा पर्जन्य अवचिती। विप्र वस्त्रे आश्रय करी गुरुसी।।८६।। तदनंतर श्रीगुरु तया सांगती। बाधतसे मज बहु शीती। जाऊनी त्वरीत तुवा मठासी। अग्नी आणावा शेकावया।।८७।। श्रीगुरु निरोप जेणेपरी। निघता झाला तो झडकरी। न दिसे वाट अंधःकारी। खुणे खुणे तो जातसे।।८८।। द्विजवर पावला मठात। सांगी तो समस्त वृत्तांत। अग्नी घालुनीया भांडियात। घेवोनी निघाला तातडी।।८९।। स्मरता झाला श्रीगुरुसी। एकभावे जाई शीघ्रेसी। येऊनी पातला संगमासी। प्रज्वाल्य केलें अग्नीसी।।९०।। प्रसन्न गुरु तया सांगती। शंभु सांगे गिरिजेसी। सर्व साध्य गुरुभक्तीसी। जो ची शिव तोची गुरु।।९१।। शिव सांगे त्वष्टा ब्रह्मापुत्र कथा। पूर्ण होण्या गुरु कार्य तत्त्वता। निबीड घोर अरण्यी प्रवेशला। तेथे भेटला तापसी तयासी।।९२।। तापसी सांगे त्यास विश्वेश्वर आराधन। तेची एक असे निधान। काशीपुर असे महास्थान। सकळाभीष्टें लाधशील तेथे।।९३।। म्हणे बालक ऐस्या काशीपुरासी। कोण नेईल माते हर्षी। विनवितो मी तव चरणासी। काशीस आपण

मज न्यावे।। ९४।। सांगावे म्हणे तो तापसीसी। काशीयात्रा करावी कैशी। सांगे तापसी सविस्तारेसी। संपूर्ण काशीयात्रा विधी त्यास।।९५।। सांगून सर्व मग तापसीसी। अदृश्य झाला तो परियेसी। ब्रह्मचारी मनी म्हणे हर्षी। नाराधिता मज भेटला शिव।।९६।। मनी श्रीगुरु स्मरण करीत। ब्रह्मचारी जाय त्वरीत। विधीपूर्वक तो आचरीत। यात्रा केली त्याने भक्तीने।।९७।। प्रसन्न शंकरे दिधला वर। जे मागितले तया गुरु - कलत्र - कन्या - पुत्र। सर्वही साध्य झाले सत्त्वर। जाहला तो सर्व विद्या कुशल।।९८।। श्रीगुरु सांगती सायंदेवासी। घडविली काशीयात्रा ही तयासी। बोलावूनी त्याच्या कलत्र पुत्रांसी। वरदान तयांसी दिधले।।९९।। श्रीगुरु म्हणती त्या द्विजासी। आज असे व्रत चतुर्दशी। करावी पूजा श्री अनंतासी। अनंतव्रत निरोपिती तयासी।।१००।।

।। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।।

**अनेक जन्म संप्राप्तं कर्म बंध विदाहीने। आत्मज्ञान प्रदानेन तस्मै श्रीगुरवे नमः।**
**हा कर्दम पुतळा गुंतला पंचभूतांच्या विश्वात। स्वतःस गुंफोनी घेती पाप पुण्याच्या फेरात।**
**पाप अन् पूण्य हे करीती लपंडाव या मायेत। जीवास खेळविती जन्म मृत्युच्या फेऱ्यात।**

करीता पठन हा अध्याय देती संजीवन। नाशोनी ऋण दारिद्र्य करीती भक्तास सिद्ध।
हे गुरुराया करो मार्ग उजागर। चरण रज की मुक्ती सागर।
परम ऊपकार हे सद्‌गुरु किन्हा। मनुष्य योनी में जन्म दिन्हा।

## आठवा अध्याय

## ।। सद्‌गुरुसुखदाध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जय जय श्री स्वामी समर्था। गुरुचरित्राची विस्तृत कथा। उतरविता आपण या गणेशहस्ता। परम भाग्य माझे हेची।।१।। श्री स्वामी समर्थ सद्‌गुरु आपण। श्रीगुरु दत्तात्रेय अवतार पूर्ण। आपुल्या आशीर्वचने राही न न्यून। प्रपंची परमार्थी भक्तांसी।।२।। श्रीनरसिंह गुरु सांगती द्विजासी। अनंत व्रत महात्म्यासी। तुवा विचारिले आम्हासी। पूर्वी कोणी हे व्रत आचरले।।३।। जाणसी युधिष्ठिर पांडुसुत। त्याने सानुज केले हे व्रत। राज्य तयांसी लाधले त्वरीत। ऐसे व्रत हे फलदायी।।४।। द्रौपदीसह पाचही पांडवांसी। व्हावे लागले वनवासी। जाणून तयांच्या बहुकष्टांसी। भक्तवत्सल श्रीकृष्ण आला।।५।। वंदुनी त्यासी अर्घ्य पाद्य देऊन। युधिष्ठिर भीम धनंजय। द्रौपदी आणि माद्री कुमर। सकल वंदिती श्रीकृष्णासी।।६।। म्हणती कृष्णासी तू असता कैवारी। आम्ही वसतो अरण्य

घोरी। आमचा बंधु तेथे राज्य करी। होईल कैसी आम्हा राज्यप्राप्ती।।७।। कृष्ण म्हणे मग पांडुसुतांसी। उत्तम व्रत सांगतो तुम्हासी। आचरावे हे व्रत भावभक्तीसी। राज्य तुम्हासी मिळेल।।८।। अनंत म्हणजे मीच जाणसी। संशय न धरावा तुम्ही मानसी। साक्षात त्रैमूर्ती मीच सर्वांशी। ब्रह्मा, विष्णु, आणि महेश्वर।।९।। कृष्ण म्हणे युधिष्ठिरासी। शुक्लपक्षी भाद्रपद चतुर्दशी। तेणे दिनी आराधावे अनंतासी। त्वरीत राज्य तू पावसी।।१०।। कृतयुगी सुमंतु द्विज वसिष्ठ गोत्री। भृगुकन्या दीक्षा त्याची पत्नी। तयांची कन्या 'सुशीला' सदाचारी। दिधली त्याने कौडिण्य ऋषिसी।।११।। जाच करी त्यांसी सापत्न माता। जाऊ म्हणती ते अन्य स्थाना। सुमंतु त्यांसी देतसे गोधूम करा। निघाले दोघे रथावरी।।१२।। नदीतीरी ऋषी असता अनुष्ठानी। सुशीला पाही व्रत आचरती नारी। तियेसी अनंतव्रत सांगती नारी। सुशीला भक्तिभावे ते आचरितसे।।१३।। पुढे पातले ते अमरावती नगरी। नगरजन समस्त म्हणती त्यासी। आपण तपोनिधी चला स्वामी। तुम्हीच येथले अधिपती।।१४।। राज्य प्राप्त झाले तयांसी। ऐसे श्रीकृष्ण सांगे युधिष्ठिरासी। आचरीतसे तो ही अनंतव्रतासी। लाधले राज्य तया पुनरपि।।१५।। श्रीगुरु सांगती द्विज सायंदेवासी। द्विज ही आचरीतसे अनंतव्रतासी। आराधना भोजन करवी श्रीगुरुंसी। श्रीगुरुमूर्ती संतुष्ट होती।।१६।। द्विज नाम ज्याचे सायंदेवो। कलत्र पुत्रांसी मग

पाठवी ठावो। मागुती आला आपण पहा हो। श्रीगुरु चरण सेवी रत झाला।।१७।। सिध्द म्हणे पुढे ऐक वत्सा। समस्त भक्त सेवा करीत असता। त्यात एक विणकर तंतिक होता। करीतसे भक्ती तो श्रीगुरुंची।।१८।। ऐसे असता व्रत शिवरात्री आले। समस्त जन यात्रेसी निघाले। बोलाविती त्यास मातापिता त्याचे। तो म्हणे माझा श्रीपर्वत गुरुचरण।।१९।। श्रीगुरु म्हणती तयासी। का बा तू यात्रेसी न जासी। तंतिक म्हणे श्रीगुरु स्वामींसी। माझी यात्रा तुमचे चरण।।२०।। श्रीगुरु गेले होते संगमासी। दोन प्रहर होता भक्त परियेसी। आपण गेला संगमी स्नानासी। उपवास असे त्याचा शिवरात्रीचा।।२१।। त्याचा भक्तिभाव पाहुनी। जवळी बोलाविती श्रीगुरुमुनी। बैस म्हणती कृपा करुनी। दाखवू म्हणती श्रीपर्वत।।२२।। म्हणती नयन झाकुनी पादुकेसी। दृढ धरी बा वेगेसी। ऐसे प्रेमे म्हणोनी त्यासी। मनोवेगे घेऊन गेले।।२३।। मग श्रीगुरु म्हणती तयासी। का गा भ्रांतपणे पहासी। वेगे जा तू शिवदर्शनासी। क्षौर स्नान करुनीया।।२४।। जाता शिघ्र तो स्नाना करीता। देखिले तयाने लोक अन् मातापिता। ते पूसती येथे आलासी कैसा। म्हणे आलो गुरुसमागमे।।२५।। पूजा करिता तो लिंगस्थानी। देखता झाला श्रीगुरुमुनी। अति विस्मय चित्ते करोनी। पूजा केली मनोभावे।।२६।। म्हणे गुरुंसी तू तर परमेश्वर। दिसतोसी तू आम्हा नर। न कळे तुझा महिमा अपार। गौप्यरुपें गुरुनाथा।।२७।। सर्व जन

मूढ होऊन। नेणती तुझे महीमान। का हो येताती या स्थानी। विस्तारोनी सांगा मज।।२८।। श्रीगुरु म्हणती ऐक भक्ता। सर्वत्र असे ईश्वर पूर्णता। स्थान महिमा असे ख्याता। जे अगम्य त्रिभुवनी।।२९।। माघ वद्य चतुर्दशी। अपार महिमा श्रीपर्वतासी। सांगेन ऐक तत्परेंसी। श्रीगुरु म्हणती तंतिकाते।।३०।। सांगती तयासी राजा विमर्षण कथा। सुशील सुगुण त्याची पतिव्रता। तो पत्नीस सांगे सप्त जन्म कथा। म्हणे जाऊ शिवलोकी सातवे जन्मी।।३१।। राजा होता श्वान एक। परी पर्वत यात्रे पावला शिवलोक। पर्वत महिमा असे बहुत। विशेष करुनी शिवरात्रीसी।।३२।। नंतर श्रीगुरु सांगती तंतिकासी। घट्ट धरी वो पादुकांसी। घेऊनी आले त्यास संगमासी। मठात त्यासी पाठविती।।३३। समस्त लोक पूसती तयास। सांगतसे तो सकल वृत्तांत। समस्त शिष्य गेले संगमा त्वरीत। पूजा जाहली संगमी बहुत।।३४।। पुढे सिध्द सांगे नामधारकासी। ऐक कथा वत्सा सविस्तारेसी। विचित्र झाले येरे दिवसी। नंदी नाम विप्र आला तेथे।।३५।। तयासी सर्वांगी कुष्ठ श्वेतवर्ण। तुळजापुरी देवी आराधी वर्ष तीन। तियेचा निरोप झाला म्हणून। आला चंद्रला परमेश्वरी स्थानी।।३६।। आराधी तियेसी सात मास। पुनरपि करीतसे तो उपवास। स्वप्न अवचित झाले त्यास। जावे गाणगग्रामी म्हणूनी।।३७।। रागे म्हणे तो ठाऊक झाले। दैवते तुम्ही मज निरोप दिधले। मनुष्यापाशी जा ऐसे म्हणितले। तुझे

हाती नोहेची काही।।३८।। पुनः तैसेची स्वप्न झाले तयासी। सकळंपि भोपे म्हणती तयासी। आजी स्वप्न झाले आम्हासी। जावे तू निरोपासरसी वेगी।।३९।। तेथुनी तो गाणगग्रामासी आला। मठी जाऊनी पुसो लागला। भक्तसकल सांगती तयाला। संगमी आहेत श्रीगुरुमूर्ती।।४०।। इतुक्यात श्रीगुरु आले मठात। द्विज उभा होता चिंतीत। भक्तजन सांगती मात। द्विज एक आला असे।।४१।। दुरोनी त्याने देखिले श्रीगुरुंसी। नमन करीत लोळे भूमीसी। श्रीगुरु म्हणती तयासी। संदेह रुपें आलासी का।।४२।। देवी पासूनी मनुष्यापाशी। येणे झाले काय कार्येसी। संदेह करुनी मानसी। कैसा आलासी द्विजवरा।।४३।। म्हणे स्वामी मी असे तमांध। तुझे दर्शनें झालो सुबुध्द। अज्ञाने वेष्टिलो होतो मंद। नेणे सोय परब्रह्मा।।४४।। देवताही मजसी उबगताती। मनुष्य कैसे मज देखती। निर्वाणी आलो तुम्हांप्रती। निर्धार केला मरणाचा।।४५।। श्रीगुरु मग हासोन बोलती। सोमनाथा सांगती न्याया संगमी। स्नाना नंतर अश्वत्थ प्रदक्षिणा करवोनी। वस्त्रे दूर टाका याची।।४६।। संगमी स्नान करुन बाहेर आला। शरीरवर्ण तयाचा पालटला। अश्वत्थ प्रदक्षिणा करु लागला। सु - वर्ण झाले सर्वांग।।४७।। श्रीगुरु म्हणती संशयी आलासी। तेणे गुणे राहीले थोडेसी। आमुचे स्तुती करावे कवित्वासी। बरवे होईल तुज मग।।४८।। श्रीगुरु कृपे ज्ञान लाधले त्याला। मंदमती जाऊन कवित्व करु लागला।

ऐकोनी जन म्हणती तयाला। श्रीगुरु म्हणजे प्रत्यक्ष परब्रह्म।।४९।। ऐकोनी गुरु म्हणती भक्तांसी। 'कवीश्वर' सर्वांनी म्हणा यासी। कवि 'बसवरस'(बसवेश्वर) नाम तयासी। ऐकोनी नंदी गुरुचरण नमी।।५०।। ऐक ऐसेची आणिक कथेसी। श्रीगुरुंस नेले हिप्परगी ग्रामासी। 'कल्लेश्वर' लिंग असे त्या ग्रामी। 'नरहरी' नाम द्विज सेवा करीतसे।।५१।। प्रतिदिनी तो पाच कवित्वे करी। जन सांगती श्रीगुरु स्तुती करी। श्रीगुरुंसी कवित्वावरी प्रीती भारी। म्हणे तो मी नरस्तुती न करी।।५२।। नरहरी मग गेला पूजे कारण। स्तवितसे तो पार्वतीरमण। ते दिवसी आली निद्रा अपरिमाण। जाहले स्वप्न तयासी।।५३।। स्वप्नी लिंगस्थानी श्रीगुरु दिसती। श्रीगुरु तयासी म्हणती। नरावरी जर नसे तव भक्ती। का गा आमुते पूजितोसी।।५४।। विस्मयी म्हणे श्रीगुरु शिवमुनी। शिवची आला असे अवतरोनी। त्रयमूर्तिंचा अवतार श्रीगुरु म्हणूनी। दर्शना आला श्रीगुरुंपाशी।।५५।। म्हणे म्या कल्लेश्वराची पूजा केली। तेणे पुण्ये आपली भेटी लाधली। आज पूजेसी गेलो त्या काळी। लिंगस्थानी तुम्हासी देखिले ।।५६।। स्वप्नावस्थेंत देखिले आपण। प्रत्यक्ष मज भेटले तुझे चरण। स्थिर जाहले मम अंतःकरण। मिळवावे शिष्यवर्गात मजसी।।५७।। श्रीगुरु म्हणती मग तयासी। कल्लेश्वर श्रेष्ठ असे आम्हासी। पूजा करी गा नित्य त्यासी। आम्ही तेथे सदा वसो।।५८।। तो म्हणे तू ची स्वामी कल्लेश्वरु। त्रयमूर्तींचा

प्रत्यक्ष अवतारु। हाची माझा सत्य निर्धारु। न सोडीन मी तुझे चरण।।५९।। ऐसे विनवोनी स्वामियासी। आला सर्वे गाणगापुरासी। कवित्वे केली बहुवसी। नित्य सेवा करीत तो राहीला।।६०।। सिध्द म्हणती नामधारका। ऐको म्हणसी श्रीगुरुचरित्रा। तुज होतील पुत्र पौत्रा। सदा श्रियायुक्त तूं होसी ।।६१।। गाणगापुरी असता श्रीगुरु। सण आला दिपवाळी थोरु। सप्त शिष्य आले पाचारु। यावे आपुल्या घरी भिक्षेसी।।६२।। एक एक ग्राम एकेकासी। श्रीगुरु मग म्हणती तयांसी। समस्तांच्या घरी यावे कैसी। तुम्ही आपणची विचार करा।।६३।। आपणात आपण ते पुसती। समस्त आपण नेऊं म्हणती। आपापसांत ते झगडती। आपुला स्वामी म्हणोनिया।।६४।। जवळी मग बोलावुनी एकेकासी। कानी प्रत्येकाच्या श्रीगुरु सांगती। आम्ही येतो तुझे घरासी। कोणापुढे तू न सांगावे।।६५।। ऐसे सात जणांसी देखा। समजावुनी श्रीगुरुनायका। पाठविले तेणेची परी ऐका। महदाश्चर्य मग वर्तले।।६६।।आठरुप झाले गुरु आपण। अपार महिमा नारायण। सात ठायीं ही गेले आपण। गाणगापुरीही होतेची ते।।६७।। ऐसी दिपवाळी जाहली। समस्ता ठायी पूजा घेतली। व्यक्त जाहले पुनः तैसेची। गौप्यरुपी कोणी नेणें।।६८।। कार्तिकमासी पौर्णिमेसी। करावया दीपाराधनेसी। समस्त भक्त आले दर्शनासी। गाणगग्रामी श्रीगुरुं जवळी।।६९।। समस्त नमस्कार करिती। भेटी दहावे

दिवसीं म्हणती। एकमेकाते ते विचारिती। म्हणती आपले घरी श्रीगुरु होते।।७०।। विस्मय करिती सकलही जन। म्हणती होय हा त्रैमूर्ती आपण। अपार महिमा नारायण। अवतार प्रत्यक्ष श्रीहरीचा।।७१।। श्रीगुरु महिमा ऐसी ख्याती। सिध्द सांगे नामधारका प्रती। समस्त भूमंडळी जाहली ख्याती। श्रीगुरु नृसिंह सरस्वतींची।।७२।। श्रीगुरु नरसिंह सरस्वती। अवतरला असे त्रयमूर्ती। गाणगग्रामी वास करिती। आतां ही असे प्रत्यक्ष।।७३।। आम्ही सांगतो तुम्हासी हीत। प्रशस्त झालिया तुमचे चित्त। गाणगापुरासी जावे त्वरीत। म्हणे गुरुभक्त सरस्वती गंगाधर।।७४।। सिध्द म्हणे नामधारकासी। अपूर्व ऐसीच कथा सांगतो तुजसी। श्रीगुरुचरित्र हे अतीव कवतुकेंसी। परम पवित्र असे ऐक बा।।७५।। गाणगापुरी असता श्रीगुरु। ख्याती तयांची झाली अपारु। भक्त होता एक शुद्र नरु। नाम तयाचे होते 'पर्वतेश्वर'।।७६।। श्रीगुरु नित्य जाता संगमासी। मार्गी शुद्र देखून त्यांसी। धावत येऊनी नमितसे साष्टांगी। पुनरपि जातसे स्वस्थाना।।७७।। माध्यान्ह काळी परत मठासी। येता तो नमस्कारी परियेसी। ऐसे कितीक दिवस वर्षी। शूद्र नित्य भक्ती करीतसे।।७८।। श्रीगुरु पुसती त्या शुद्रासी। वासना काय वसे मानसी। शुद्र कर जोडून विनवी त्यांसी। शेती भरपूर पीक यावे।।७९।। श्रीगुरु तदा पुसता त्यासी। काय पेरीले तुझ्या शेतासी। शुद्र म्हणे यावनाळ (ज्वारी) बहुवसी। पीक जाहले तुझिया

कृपे।।८०।। श्रीगुरु म्हणती मग त्यासी। जरी भक्तीने वाक्य अंगिकारिसी। तरीच आम्ही सांगू तुजसी। एकोभावे ते त्वा करावे।।८१।। म्हणे गुरुवाक्य प्रमाण मजसी। श्रीगुरु मग निरोपिती त्यासी। परत आम्ही येतो माध्याह्नेसी। तंव तू सर्व पीक कापावे।।८२।। शीघ्र तो आला ग्रामात। अधिकारियासी तो विनवीत। खंडोनी द्यावे आपुले शेत। गत संवत्सराप्रमाणे देईन धान्य।।८३।। कापू आंरभिले पिकासी। स्त्री - पुत्र सकल वर्जिती त्यासी। म्हणती पिसें लागले यासी। शूद्र कोणाचे न ऐकितसे।।८४।। शूद्रे समस्त पीक कापले। श्रीगुरु म्हणती 'विनोदे सांगितले'। शूद्र म्हणे 'तुमचे वाक्यच भलें'। तेची कामधेनू मजसी।।८५।। ऐसे एकोनी श्रीगुरु म्हणती। निर्धार जरी असेल तुझे चित्ती। होईल अत्यंत फळश्रुती। चिंता न करावी तू भक्ता।।८६।। शुद्र सांगे त्याच्या स्त्री पुत्रांसी। श्रीगुरु कृपा होय ज्यासी। दैन्य कसे असेल त्यांसी। श्रीगुरु प्रत्यक्ष कामधेनु।।८७।। समस्त राहीले निवांत। ऐसे आठ दिवस क्रमीत। अवचित वारा वाजला अतिशीत। ग्रामीचे पीक नासले।।८८।। समस्त राष्ट्रीचे पीक देखा। शीतें नाशिले सकळिका। पर्जन्य पडला अकाळिका। मूळ नक्षत्री परियेसा।।८९।। ग्राम राहीला पीके वीण। शूद्र शेत वाढले दशगुण। वाढले यावनाळ सगुण। एकेका अकरा परगडेंसी।।९०।। हर्षे पत्नी म्हणे विनवोनी। शेतींचे पांडवांसी पूजोनी। करिती विचार शूद्र पतिपत्नी। श्रीगुरुदर्शना जावे

आता।।९१।। म्हणोनी सर्व आयतीसी। पूजो आले ते श्रीगुरुंसी। स्वामी पूसती तयांसी। काय वर्तमान म्हणोनिया।।९२।। म्हणती तव वचन आम्हा अमृत। पूर्ण जाहले आमचे काम्य। सत्य तुझे भक्तवत्सल ब्रीद। शरण आलो तुज आम्ही।।९३।। नाना प्रकारे पूजा आरती। शूद्र स्त्री करीतसे भक्ती। श्रीगुरु संतोषले अति प्रीती। म्हणती लक्ष्मी अखंड तुझे घरी।।९४।। निरोप घेऊनी आले दोघे जण। शूद्र सांगी अधिकाऱ्या बोलावून। गावचे पीक गेले संपूर्ण। मी आपण देईन अर्धा वाटा।।९५।। म्हणती तयासी अधिकारी। गुरुकृपे तुज पीक झाले बहुपरी। नेऊनीया ते आपुले घरी। राज्य करी म्हणती त्यासी ।९६।। संतोषोनी शूद्र देखा। विप्रांसी वाटी धान्य अनेका। घेऊनी गेला सकळिका। राजवाटाही देऊनी।।९७।। म्हणोनी भजा भजा श्रीगुरुंसी। जे जे काम्य तुमचे मानसी। साध्य ते होईल त्वरीतेसी। भक्तांसी प्रचिती येई निश्चिती।९८।। सिध्द म्हणे नामधारकासी। गुरुचरित्र महीमा परियेसी। दृढभक्ती असे सदा ज्यांसी। कैचे दैन्य त्याचे घरी।।९९।। सकळाभीष्टे तयासी होती। लक्ष्मी राहे अखंडिती। गुरुसेवा करावी भावभक्ती। म्हणे सरस्वती गंगाधर।।१००।।

।। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।।

न गुरोरधिकं तत्त्वं न गुरोरधिकं तपः। तत्त्वज्ञानात् परंनास्ति तस्मै श्रीगुरवे नमः।
अष्ट सिद्धी करीती साध्य अवजड काम। पार करोनी दुःख पोहोचवती सुख धाम।
नित्य करीता हा अध्याय पठण। दारीद्र्याचे वावटळ करीती सदा क्षमन।
बनोनी माता करीसी समृद्धीचे पान। गुरु सदैव देती या जीवास भक्तिचे दान।
माय बाप बनुनी ते करीती सदैव रक्षण। देसी सुकुन दुःखाचे करुनी क्षालन।
घालुनी अंजन ज्ञानाचे या नेत्रात। करवी या भक्तास सिध्द या गुढरुपी मायेत।

नववा अध्याय

## ।। परमसंदेशाध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री नवनाथाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

स्वामी समर्थ कृपा हेची निधान। गणेश मी बालक अज्ञ सान। लिहविता मम हस्ते श्रीगुरुचरित्र संपूर्ण। अहो धन्य भाग्य माझे।।१।। आपुल्या चरणी मी अत्यंत लीन। ग्रंथ नवशती होतसे आता पूर्ण। असावे असेच आपुले आशीर्वचन। विनंती हीच तव चरणी।।२।। नामधारक पुसे 'त्रिमूर्तींचा अवतार'। वेषधारी तो होऊनीया नर। परमप्रेमे राहीला क्षेत्री गाणगापुर। काय कारण सांगावे मज।।३।। ऐकोनी वचन सिध्दमुनी सांगती। आश्विन वद्य चतुर्दशी दिपवाळी। ह्या पर्वणी श्रीगुरु शिष्यांसी सांगती। स्नान करावे पवित्र त्रिस्थळींचे।।४।। गया प्रयाग आणि वाराणशी। ग्रामाजवळी ही तीर्थे असती। ऐसे श्रीगुरु शिष्यांसी सांगती। अमरजा संगमी त्यांसी नेले।।५।। श्रीगुरु सांगती शिष्यांसी। जालंधर दैत्यकथा ऐसी। पळविले तयाने देवांसी। पराभवीले तयाने इंद्रपुर।।६।। देवेंद्र येऊनी सांगे

शिवासी। शिव निघाला दैत्या मारावयासी। इंद्र म्हणे जीवन देण्या देवांसी। काही उपाय करावा।।७।। शिवाने उच्चारुन अमृतवचन। दिधला घट संजीवन जल पूर्ण। इंद्र अमरनाथासी जाता घेऊन। थेंब पडीले भूवरी तीच अमरजा।। ८।। या कारणे या नदीत जे स्नान करिती। अपमृत्यु कदा न घडे त्यांसी। अपस्मारादि सर्व दोष जाती। जाती ब्रह्महत्यादि पातके।।९।। श्रीगुरु दाविती वृक्ष अश्वत्थ। सेवा करिता होती पूर्ण मनोरथ। साक्षात असे हा कल्पवृक्ष। मग नेती शिष्यांसी शंकरभुवनी।।१०।। संगमेश्वर असे त्रिनयनी। पूजा करोनी नंदिकेश्वरा नमुनी। यावे तेथूनी चंडीस्थानी। तेथूनी यावे सोमसूत्रासी।।११।। पुढे दाविती तीर्थ वाराणशी। सांगती एक विप्र ध्यायी शिवासी। सांगे आम्हा नित्य पाहीजे काशी। दर्शन द्यावे म्हणूनी तो नमितसे।।१२।। ईश्वर हा भोळा -चक्रवर्ती। प्रसन्न जाहला अतिप्रीती। प्रकटले काशीक्षेत्र निश्चिती। मणिकर्णिका कुंड झाले।।१३।। श्रीगुरु म्हणती भक्तजनांसी। काशीतीर्थ प्रकटले ऐसी। तीर्थ असे हे अतिविशेषी। वाराणसीच ही प्रत्यक्ष।।१४।। गुरु दाविती तीर्थ पापविनाशी। स्नानमात्रेची पापनाशी। सांगती पूर्वदेह भगिनी रत्नाबाईसी। पाप तुझे असे गहनी।।१५।। श्रीगुरु म्हणूनी सांगती तिजसी। वधिलेसी तू पाच मार्जारांसी। तेणे कारणे श्वेतकुष्ठ झाले तुजसी। भोगिशी आता वा पुढील जन्मी।।१६।। रत्नाबाई विनवितसे श्रीगुरुंसी। भोगीन पाप

याच जन्मासी। मुक्त करावे बा मजसी। म्हणूनी आले श्रीचरणांपाशी।।१७।। श्रीगुरु तिजसी निरोपिती। पापविनाशी जा गे त्वरिती। स्नाने सप्तजन्म पापे भग्न होती। कुष्ठही जाऊन हो सुखी।।१८।। पुढे गुरु सकळिका ' कोटीतीर्थ' दाविती। म्हणती याची तीर्थमहिमा ऐसी। एकेक दानाचे पुण्य कोटीसरसी। यथाशक्ती दान येथे करावे।।१९।। पुढे तीर्थ 'रुद्रपाद' दाविती। गुरु म्हणती जे आचार गयेसी। करावे ते पूजून रुद्रापादाशी। कोटी जन्म पापें जाती।।२०।। सांगती श्रीगुरु तैसे 'चक्रतीर्थ'। असे ते अतिविशेष पवित्र। या तीर्थी स्नानमात्रे लाभे ज्ञान। द्वारावती समान हे पुण्यक्षेत्र।।२१।। ग्राम पूर्व भागेसी 'मन्मथतीर्थ'। कल्लेश्वर देव असे विश्वेश्वर। गोकर्ण महाबळेश्वरा समान क्षेत्र। मन्मथी स्नान करुन पूजा शिवासी।।२२।। ऐकोनी महात्म्य म्हणती भक्तजन। स्वामी सांगितले तीर्थ महिमान। पुनीत झालो आम्ही सर्व ऐकून। यात्रेसी दूर जावे कशासी।।२३।। सिध्द म्हणे नामधारकासी। अष्टतीर्थ महिमा आहे ऐसी। श्रीगुरुंनी निरोपिले आम्हासी। म्हणोनीच मी तुज सांगितले।।२४।। गुरुभक्ती म्हणजे कामधेनु। जे आचरती विद्वज्जनु। वसिष्ठादि थोर शुकमुनी गुरु। सारज्ञ जे सकल शास्त्रांचे।।२५।। ईश्वर पार्वती संवाद। कथा निर्मळ अति विनोद। ते आचरती मुक्तिपद। हा मार्ग असे सद्‌गुरुचा।।२६।। पूर्वी कैलास शिखरी। बैसला होता त्रिपुरारी। प्रश्न तयासी करी शैल्यकुमरी।

समस्त लोक उध्दरावया।।२७।। भगवान सदाशिवऋषी होऊनी प्रसन्न। निवेदीती तिजसी ‘गुरुगीता’ पूर्ण। सकलां भवसागर तरण्या अपूर्व साधन। गुरुगीता नित्य पठन करावी।।२८।। शिव सांगती ‘अखण्ड मंगलाकारं, व्याप्तं येन चराचरम्। तत्पदं दर्शितं येन, तस्मै श्रीगुरवे नमः।।२९।। ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः। पूजामूलं गुरोः पदम्। मंत्रमूलं गुरोर्वाक्यम्। मोक्षमूलं गुरोः कृपा।।३०।। या कलियुगा माझारी। ज्ञानी झाले मूढापरी। कांही नेणती अंधबधिरीं। मायापाशे वेष्टोनिया।।३१।। याकारण तुम्ही विद्वज्जन। ‘गुरुभाव’ धरावा करुनी स्थिर मन। तुमचे तुटेल भवबंधन। श्रीगुरुराज कृपाप्रसादें।।३२।। भूमिभार उतरावया कारणे। जन्म धरीला श्रीपादराय नामे। प्रत्यक्ष श्रीदत्तात्रेय - अवधुतरायें। वेष धरिला नरदेही।।३३।। देह धरुनी श्री गुरुमूर्ती। उध्दरती समस्त जडमती। अवतरले आपण लक्ष्मीपती। भाविक भक्ता उध्दरावया।।३४।। सिध्द सांगे पुढे कथा। सांगितली पूर्वी रजक कथा। राज्यपद तो झाला मागता। प्रसन्न श्रीगुरुंनी वर दिधला।।३५।। उपजला तो म्लेंच्छ यातींत। विदुरानगरी राज्य करीत। पुत्रपौत्री अनेक रीतींत। महानंदे परियेसा।।३६।। विशेष भक्ती विप्रांवरी। असे ती पूर्वसंस्कारी। असती देवालये भूमिवरी। उपद्रव न देई तयांसी।।३७।। त्याचे पुरोहीत तया शिकवित। काष्ठवृक्ष पाषाणासी पूजती द्विज। आपण होऊन म्लेंच्छ यात। देव द्विजांसी आपण निंदावे।।३८।। राजा म्हणे

तुम्ही निरोपिले आम्हासी। सर्वेश्वर पूर्ण अणुरेणु तृणकाष्ठेसी। सृष्टी ही असे ईश्वराची, एकच देव सर्वांसी। तर्क भेद हे सारे मतांचे।।३९।। पुरोहीतांसी सांगे राजा ऐसे परी। ठेवी विश्वास देवद्विजांवरी। पुढे तया राजाचे मांडीवरी। स्फोटक (करट) एक उद्‌भवला।।४०।। नानापरीचे वैद्य येती। तया स्फोटका लेप करिती। शमन नोहे कवणे रीती। महादु:खे तो कष्टतसे।।४१।। राजा मग बोलावून विप्रांसी। पूसे काय उपाय यासी। विप्र सांगती त्या राजासी। असे उपाय ऐका एकचित्ते।।४२।। विप्र सांगती भल्या सत्पुरुषासी। भजावे आपण भावेसी। तयाचे कृपा दृष्टी सरसी। बरवे होईल निश्चिती।।४३।। विप्र म्हणती तया रायासी। स्थान बरवे पापविनाशी। स्नान तेथे करावे भावेसी। एक चित्ते परियेसा।।४४।। ऐकोनिया विप्र वचनासी। राजा गेला पापविनाशी तीर्थासी। तेथे स्नान करिता क्षणेसी। आला तेथे एक यती।।४५।। राजा भावे करी नमन। मग तयासी स्फोट दावून। पूसे केवी होय उपशमन। यती सांगे 'घे महानुभाव दर्शन'।।४६।। यती सांगे तयासी आख्यान। अवंती राजसुताचे दारुण। राजा ऐके एक चित्ते करुन। करीतसे वंदन तो यतीसी।।४७।। अवंती राजा सोडीतसे राणीस रानी। भटकत असे पुत्रासवे वनी। गुरे चरती अरण्यी पाहोनी। जाई गोरक्षकांजवळी ती।।४८।। तया आज्ञे राजमंदिरी गेली ती पुत्रासह। ऐकोनी तियेचा दु:खद वृत्तांत। जाहला वैश्यराजा

पद्माकर कृपावंत। दिधले एक गृह तिजसी।।४९।। ऐसे वर्तत असता एके दिवशी। प्राण गेला कुमरकासी। बहुत दुःख करीत असे ती। तेव्हा ऋषभ योगी आला त्वरिता।।५०।। योगी पुसतसे दुःख कारण। वाणी सांगी वृत्तांत वर्णुन। योगी सांगे तिज जवळ जाऊन। मूढपणे तू दुःख करिसी।।५१।। राजपत्नी करी योग्यासी विनंती। जाहली आम्हासी ऐसी गती। पुत्र जाता वाचोनी काय प्रीती। म्हणुनी ती वंदन करीतसे।।५२।। पूर्व उपकारे जाहला प्रसन्न योगी। प्रेत कपाळी भस्म काढूनी लावी। घाली भस्म प्रेत मुख कमळी। प्राण आला तयासी परियेसा।।५३।। वंदन ते करती योगियासी। शरीर तयांचे झाले सूर्य सकाशी। शोभायमान दिसे ती कैसी। दिव्य देह झाले ते उभय।।५४।। योगी म्हणे तव सुत भद्रायुषी। कीर्तिवंत होईल परियेसी। राज्य करील बहुवसी। पित्याहून अधिक जाण।।५५।। राजपत्नी अन् पुत्रा वर देऊनी। योगी निघून गेला तत्क्षणी । यति सांगे राया ऐक एकोमनी। ऐसे सत्पुरुषाचे निधान।।५६।। एकोभावे राजा आपण। निघाला तो घेण्या गुरुदर्शन। प्रयाणांतरी करी प्रयाण। आला तो गाणगापुरासी।।५७।। पाहुनी श्रीगुरु म्हणती तयासी। का रे रजका कोठे अससी। बहुत दिवसां भेटलासी। आमचा दास होवोनिया।।५८।। ऐसे गुरुवचन ऐकोनी। म्लेंच्छ झाला महाज्ञानी। पूर्वजन्म स्मरला मनी। करी सांष्टागी नमस्कार।।५९।। राजा म्हणे श्रीगुरुंसी।

जाहला स्फोटक मज ऐसी। स्फोटक नाही दाखवी म्हणोन। पुसताती गुरु यवनराजासी।।६०।। राजा पाहे स्फोटकासी। न दिसे स्फोटक अंगासरसी। विस्मय करीतसे मानसी। पुनरपि गुरुचरणी माथा ठेवी।।६१।। श्रीगुरु बोलती यवनासी। म्हणती जाहलो अतिसंतोषी। तुवां भक्ती केलियासी। संतोषलो आपण आजी।।६२।। आता पापविनाशी तीर्थासी। भेटी आमुची होईल तुम्हांसी। ऐसे म्हणून यवन रायासी। अदृश्य जाहले श्रीगुरुमूर्ती।।६३।। पापविनाशी तीर्थासी। श्रीगुरु पातले त्वरितेसी। राहीले तेथे अनुष्ठानासी। समस्त भक्त येती भेटीते।।६४।। साखरे सायंदेवाचा सुत। आला भेटीस नागनाथ। नानापरी तो पूजा करीत। समाराधना आरंभिली।।६५।। इतुके होता झाली निशी। श्रीगुरु म्हणती नागनाथासी। सांगोनी आलो म्लेंच्छासी। पापविनाशी भेटी म्हणोनी।।६६।। ऐसे सांगोनी गुरु आपण। गेले पापविनाशी जाण। बैसोनिया शुभासन। अनुष्ठान करीत होते।।६७।। चतुश्चत्वारि क्रोश देखा। राजा पातला दिवसे एका। पाप विनाशी तीर्थी निका। अवलोकीतसे श्रीगुरुंसी।।६८।। मग सवाजंत्री महासिंहासन स्थानी। श्रृंगार केला अति गहनी। पूज्य जगद्‌गुरुंते नेऊनी। राजा बैसवी सिंहासनी।।६९।। अंतःपुरीचे कुल स्त्रियांसी। पुत्रपौत्र सहोदरांसी। भेटविले राजे परियेसी। साष्टांगी सकल नमस्कारिती।।७०।। राजा विनवी स्वामियासी। अंतर पडले श्रीचरणांसी। राज्य केले बहुवसी।

आता द्यावी चरणसेवा।।७१।। ऐसे ऐकोनी श्रीगुरु म्हणती। आमुची भेटी श्रीपर्वती। तुझे पुत्र राज्य करिती। तुवा यावे भेटीसी।।७२।। ऐसा निरोप देऊनी। श्रीगुरु निघाले तेथोनी। राजा विनवी चरण धरोनी। ज्ञान मजला असावे।।७३।। कृपासिंधु श्रीगुरुनाथ। ज्ञान होईल ऐसे म्हणत। आपण निघाले त्वरीत। गेले गौतमी - यात्रेसी।।७४।। स्नान करुनी गौतमीसी। आले श्रीगुरु गाणगापुरासी। आनंद झाला समस्तांसी। श्रीगुरुचरण दर्शने।।७५।। श्रीगुरु शिष्यांते बोलाविती। श्रीगुरु त्यांसी निरोपिती। प्रगट झाली बहु ख्याती। आता रहावे गौप्य आम्ही।।७६।। यात्रारुपे श्रीपर्वतासी। निघालो आता परियेसी। प्रगट बोल हाची स्वभावेसी। गौप्यरुपे राहू येथेची।।७७।। स्थान आमुचे गाणगापूर। येथुनी न वचो निर्धार। लौकिकमते अवधारा। बोल करितो श्रीशैलयात्रा।।७८।। प्रगट निघो यात्रेसी। वास निरंतर गाणगाभुवनासी। भक्तजन तारावयासी। राहू आम्ही निरंतर।।७९।। कठिण दिवस युगधर्म। म्लेंच्छ राज्य क्रूरकर्म। प्रगट असतां घडे अधर्म। समस्त म्लेंच्छ येथे येती।।८०।। आम्ही असु याच ग्रामी। नित्य स्नान अमरजा संगमी। वसो मठी सदा प्रेमी। गौप्यरुपे निश्चित अवधारा।।८१।। प्रात:स्नान कृष्णातीरी। पंचनदी - संगम औदुंबरी। अनुष्ठान बरवे त्याक्षेत्री। माध्याह्नी येतो भीमातटी।।८२।। संगमी स्नान करोनी। पूजा घेऊ मठी निर्गुणी। चिंता न करा अंत:करणी। म्हणोनी

सांगती प्रीतिकरे।।८३।। ऐसे सांगोनी तयांसी। निघाले स्वामी श्रीपर्वतासी। भक्त आले परतोनी मठासी। तेथे दिसती श्रीगुरुनाथ।।८४।। दृष्टांत दाखवोनी भक्तांसी। पातले आपण श्रीपर्वतासी। पाताळ गंगा तीरासी। राहीले स्वामी परियेसा।।८५।। शिष्याते ते निरोपिती अवधारा। पुष्पांचे आसन त्वरीत करा। आम्हा जाणे असे पैलतीरा। ऐक्य होण्या मल्लिकार्जुनी।।८६।। निरोप देता श्रीगुरुमूर्ती। आणिली पुष्पे शेवंती। कमळ कल्हार मालती। कर्दळीपर्ण वेष्टोनी।।८७।। बैसोनिया पुष्पासनी। जावे ग्रामासी शिष्या सांगोनी। 'जातो निजमठासी' ऐसे म्हणोनी। सांगती, ''तुम्हासी प्रसाद पुष्पें पाठवू।।८८।। शेवंती पुष्पे येतील तरंगुन। घ्यावी तुम्ही प्रसाद म्हणून। आणिक गायनी करा मम स्मरण। गायनी प्रीती असे मज बहु''।।८९।। बहुधान्य नामे संवत्सरेसी। शिशिर ऋतु माघ मासी। कृष्णपक्ष प्रतिपदा शुक्रवार दिवशी। श्रीगुरु बैसले निजानंदी।।९०।। शिष्य बहु चिंता करीत असती। नावेकर येऊनी झाले सांगती। निरोप देती नृसिंह सरस्वती। जातो म्हणाले कर्दळीवनी।।९१।। निरोप सांगितला तुम्हासी। जावे आपुलाले स्थानासी। प्रसाद पुष्पे येता घ्यावी काढोनी। रहावे सुखी मम भक्ती करोनी।।९२।। सांगता ऐसे इतुक्या अवसरी। प्रसाद पुष्पे तरंगत आली चारी। मुख्य शिष्य जे प्रीतिकरी। काढोनी घेती अवधारी।।९३।। मी स्वतः अन् साखरे सायंदेव। कवी नंदी आणि नरहरी

देव। पुष्प घेते झाले ऐसे चतुर्वर्ग। तेची हे पुष्प मम पूजनी।।९४।। सेवूनी कथामृत नामधारक तटस्थ होत। गात्रे कंपित कंठ सद्गदित। लाभले तयासी समाधीसुख। देखोनी सिध्द मुनी सुखावती ।।९५।। सिद्ध प्रेमें तया कुरवाळिती। प्रेमे आलिंगुनी तया सांगती। ज्ञान हे सांगावे लोकांप्रती। दृढ श्रद्धा असावी श्रीगुरुचरणी।।९६।। नामधारक सिध्दांसी विनवित। म्हणे परमामृत हे श्रीगुरुचरितामृत। बुडोनी अजुनी आहे मी अतृप्त। हेची कथा पुनः सांगावी।।९७।। नामधारकाची इच्छा ऐकून। जैसे त्रैलोक्य चिंतामणी रसायन। संग्रह जयाचा करती विचक्षण। तैसी सारपूर्ण अवतरणिका सांगती।।९८।। धन्य धन्य गंगाधरसुत। भक्त सायंदेवाचा तो वंशज। भक्तजनांच्या उद्धारास्तव। गुरुचरित्रामृत गंगा आणिली भूवरी।।९९।। नमन माझे श्रीगुरुचरणांसी। गुरुचरित्र प्रत्यक्ष वाङमय गुरुमूर्ती। वंदुनी ग्रंथकर्त्या गंगाधर सुतासी। जाहला धन्य वैद्य गणेश।।१००।।

।। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु ।।

**मन्नाथ श्री जगन्नाथ सद्गुरु श्री जगद्गुरु। मदात्मा सर्व भूतात्मा तस्मै श्रीगुरवे नमः।**

**वर्षा करती अमृतधारा जगवी निसर्गास। तयासमान गुरुचे वचन फुलवती या जीवास।**

प्रसन्न होऊनी भक्तावरी घालती ज्ञानाचे पांघरुण। सांडोनी हा अहंभाव करीती भक्ताचे संधारण।
काळा निर्जन जणू पहाड ऋण दारिद्र्याचा। कुबेराचे धन देऊनी दाखवी सुखरूपी बगीचा घेऊनी।
कुशी बाळास करण्या पालन। सद्गुरु घेऊनी भक्तास करविती भक्तिचे लालन।
अब सद्गुरु लिलामृत मृतास करीती संजीवन। भक्तिचे पाजूनी क्षीर मूढास करीती बुद्धिवान।
चाटोनी बछड्यास जशी गोमाता देती प्रेमाची साक्ष। अभय देऊनी भक्तास सद्गुरु देती भक्तिचे लक्ष।